

दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28



अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २७८। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - डॉ. सुदीप किसन हासे (एम.ई. पीएच. डी.) | शुक्रवार २०/११/२०२६ पाने - ६



गुटखा बंदी कागदावरच!

संगमनेरमध्ये होते खुलेआम विक्री


एआय फोटो

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्यात गुटखा विक्री आणि साठवणुकीवर बंदी असताना संगमनेर शहर व तालुक्यात मात्र या बंदीचा अक्षरशः फज्जा उडाल्याचे चित्र दिसत आहे. पानटपऱ्या, किराणा दुकाने आणि जनरल स्टोअर्समध्ये आजही गुटख्याची खुलेआम विक्री सुरू असल्याची चर्चा आहे. त्यामुळे गुटखा बंदी नेमकी कागदावरच आहे का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कडक कारवाईचा धाकही गुटखा विक्रेत्यांना राहिलेला नाही का, असा प्रश्न आता निर्माण झाला आहे.

गुटख्याचे दर काजू-बदामापेक्षाही महाग असले, तरी त्याचे शौकीन अधिक पैसे मोजूनही गुटखा मिळविण्यासाठी धडपडताना दिसतात. विशेष म्हणजे संगमनेरमध्ये हा प्रतिबंधित गुटखा सहज उपलब्ध होत असल्याने विक्रेत्यांचे धाडस वाढले आहे की प्रशासनाचा वचक कमी झाला आहे, याचा शोध घेण्याची गरज आहे. बंदी असलेल्या. (पान २ वर)

तुकाराम मुंढेंच्या कारवाईचा धाक कुठे गेला?

कारवाईचा गाजावाजा नको, गुटखा विक्रीचे समूळ उच्चाटन हवे!

गुटखा बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाने केवळ छापेमारीपुरते मर्यादित न राहता पुरवठादार, साठेबाज आणि वितरकांवर कठोर कारवाई करावी. नियमित तपासणी, गुप्त माहितीच्या आधारे छापे, विक्रीच्या ठिकाणांची पडताळणी आणि दोषींवर कायदेशीर कारवाई करणे आवश्यक आहे. अन्यथा गुटखा बंदीचे आदेश कागदावर राहतील आणि प्रत्यक्षात प्रतिबंधित गुटख्याचा बाजार मात्र तेजीत राहील.

संगमनेरच्या वाहतुकीला शिस्त लागणार तरी कधी?

सिग्नल यंत्रणाही कुचकामी; आ. तांबे यांचा वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पुढाकार



संगमनेर (प्रतिनिधी) :

संगमनेर शहरातील वाहतुकीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत असून, बेशिस्त पार्किंग, रस्त्यांवरील अतिक्रमणे आणि वाहतुकीच्या नियमांकडे होणारे दुर्लक्ष यामुळे शहरातील प्रमुख रस्त्यांवर वाहनचालकांसह पादचाऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. रस्ते वाहतुकीसाठी आहेत की वाहनांच्या पार्किंगसाठी आणि दुकानांच्या विस्तारीकरणासाठी, असा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिकांना पडू लागला आहे. नगरपालिका आणि पोलीस प्रशासनाकडून वारंवार सूचना देऊन तसेच कारवाईचे इशारे देऊनही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा होत नसल्याने संगमनेरच्या वाहतुकीला शिस्त लागणार तरी कधी, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

शहरातील नवीन नगर रोड, बसस्थानक परिसर, विद्यानगर परिसर, मुख्य बाजारपेठ, अशोक चौक आदी भागांत वाहतुकीची समस्या अधिक तीव्र झाली आहे. अनेक व्यापारी दुकानातील साहित्य रस्त्यावर मांडून व्यवसाय करतात. काही ठिकाणी दुकानांसमोरील जागा अतिक्रमित झाल्याने रस्त्याची रुंदी आपोआप कमी होते. त्यातच दुचाकींचे अस्ताव्यस्त पार्किंग आणि अचानक गर्दीत घुसणाऱ्या चारचाकी वाहनांमुळे काही मिनिटांतच वाहतुकीचा पूर्णपणे खोळंबा होतो. विशेषतः बाजारपेठेत खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांना वाहन लावण्यासाठी जागा मिळत नाही. परिणामी, मिळेल त्या ठिकाणी वाहने उभी केली जातात आणि वाहतुकीची कोंडी आणखी वाढते.

शहरातील अनेक व्यावसायिक आस्थापनांमध्ये वाहनतळाची पुरेशी सुविधा नाही. ज्या ठिकाणी पार्किंगची व्यवस्था उपलब्ध आहे, तेथेही तिचा प्रभावी वापर होताना दिसत नाही. ग्राहकांची वाहने रस्त्यावर उभी राहत असल्याने सार्वजनिक रस्त्यांवरील वाहतुकीवर अतिरिक्त ताण निर्माण होतो. दुसरीकडे, पादचाऱ्यांसाठी असलेल्या जागेवरही अतिक्रमण झाल्याने नागरिकांना जीव मुठीत धरून वाहनांच्या गर्दीतून मार्ग काढावा लागत आहे.

वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी शहरातील काही प्रमुख चौकांमध्ये सिग्नल यंत्रणा बसविण्यात आली आहे. मात्र, या यंत्रणेतील सातत्याचा अभाव आणि वारंवार होणारे तांत्रिक बिघाड यामुळे सिग्नलचा अपेक्षित उपयोग होताना दिसत नाही. सिग्नल सुरू असतील तरच वाहतुकीचे नियोजन आणि बंद असतील तर पुन्हा मनमानी, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे केवळ सिग्नल बसवून प्रश्न सुटणार नाही, तर त्यांची नियमित देखभाल आणि वाहतूक नियमांची कठोर अंमलबजावणीही आवश्यक आहे.

शेवटी प्रश्न एकच... शहरातील रस्ते मोकळे ठेवण्याची जबाबदारी फक्त प्रशासनाची आहे का? नागरिक आणि व्यापाऱ्यांनीही सहकार्य केले तरच संगमनेरची वाहतूक कोंडी सुटू शकते. प्रशासनाने कारवाई करावी आणि नागरिकांनी नियम पाळावेत या दुहेरी प्रयत्नांतूनच संगमनेरला बेशिस्त वाहतुकीच्या विळख्यातून मुक्त करता येईल.

दरम्यान, शहरातील वाहतुकीचा हा गंभीर प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार सत्यजित तांबे यांनी पुढाकार घेतला आहे. नुकतीच त्यांनी शहर पोलीस ठाण्यात पोलीस अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन वाहतूक कोंडी, अतिक्रमणे आणि बेशिस्त पार्किंगच्या प्रश्नावर चर्चा केली. (पान ३ वर)





पत्रकारांचा दर्जा आणि संरक्षण रील क्रिएटर्सना मिळणार नाही



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

सोशल मीडियासाठी रील बनवणाऱ्यांना पत्रकारांप्रमाणे कायदेशीर संरक्षणाची मागणी करता येणार नाही, अशी भूमिका दिल्ली पोलिसांनी सर्वोच्च न्यायालयात मांडली आहे. पत्रकार आणि व्यावसायिक उद्देशाने व्हिडीओ तयार करणारे कंटेंट क्रिएटर्स यांच्यात फरक असल्याचे पोलिसांनी प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. जंतरमंतरवरील मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधातील आंदोलनादरम्यान पत्रकारांना अडवल्याच्या आरोपांवर पोलिसांनी हे स्पष्टीकरण दिले. वृत्तानुसार, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधातील निदर्शनांचे वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांविरुद्ध पोलिसांनी गैरवर्तन केले, असा आरोप करणोत्या विविध संघटनांनी (नेटवर्क ऑफ वुमन इन मीडिया, फ्री स्पीच कलेक्टिव्ह, दिल्ली युनियन ऑफ जर्नलिस्ट्स आणि केरळ युनियन ऑफ वर्किंग जर्नलिस्ट्स) सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या प्रकरणी न्यायालयाने पोलिसांना प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले होत. त्यानुसार दिल्ली पोलिसांनी प्रतिज्ञापत्र टाखल केले आहे.







Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा

- अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
- माफक दरात - संगमनेर येथेच
- 105 बेड्स
- तज्ञ डॉक्टर्स
- अत्याधुनिक सुविधा

कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध

हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग

सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33

पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना

9953299532 आजच संपर्क करा

24/7 Emergency Services

कोतूळ ग्रामपंचायतीत इंदिरा गांधी जयंतीनिमित्त अभिवादन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भारताच्या माजी पंतप्रधान, भारतरत्न स्वर्गीय श्रीमती इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त कोतूळ ग्रामपंचायत कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी आमदार किरण लहामटे उपस्थित होते. त्यांनी इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले. देशाच्या राजकारणात इंदिरा गांधी यांनी आपल्या कणखर नेतृत्वाने महत्त्वपूर्ण योगदान दिले. देशाची एकता, अखंडता आणि विकासासाठी त्यांनी केलेले कार्य सदैव स्मरणात राहील, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

याप्रसंगी माजी उपसरपंच गणेश पोखरकर, विनय समुद्र, हेमंत देशमुख, प्रदीप भाटे, डॉ. अभिजित देशमुख, रवी आरोटे,ग्रामपंचायत पदाधिकारी, सदस्य, स्थानिक लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मागील वादातून तरुणाला मारहाण- नऊ जणांविरुध्द गुन्हा दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन, फोटोशूट आटोपून राहत्या घराकडे मोटारसायकल वरून परतणाऱ्या युवा फोटोग्राफरला खांडगाव फाटा बायपासवर अडवून नऊ जणांनी बेदम मारहाण केल्याची घटना शनिवारी रात्री सव्वा दहाच्या सुमारास घडली. या प्रकरणी जखमी युवकाच्या फिर्यादीवरुन संगमनेर शहर पोलीस ठाण्यात नऊ जणांविरोधात मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निखिल रमेश डोंगरे (वय २१ वर्षे) धंदा फोटोस्टुडिओ, रा. निमज ता. संगमनेर असे फिर्यादीचे नाव आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, संगमनेर मधील एका हॉटेलमधील फोटो शूटची ऑर्डर आटोपल्यानंतर फिर्यादी निखील डोंगरे रात्री दहाच्या सुमारास निमज गावाकडे जाण्यासाठी मोटारसायकल वरुन निघाला होता. सव्वादहाच्या सुमारास खांडगाव फाटा सर्व्हिस रस्त्यावर त्याला पाठीमागून मोटारसायकलवरून आलेल्या काही जणांनी थांबवले. त्यानंतर नितीन लष्करे याने त्याच्या हातातील काहीतरी टणक वस्तुने फिर्यादीच्या डाव्या डोळ्याच्या वर डोक्याला मारुन जखमी केले. मार लागल्याने तो खाली बसला असता, सुदाम पवार, प्रदिप मोहीते, राहुल मोहिते, विशाल माने, रविंद्र लष्करे, आदित्य कुसाळकर, अभिषेक माने, प्रेम आळकुटे, सर्व रा. विद्यानगर, निमज, ता. संगमनेर यांनी फिर्यादीला लाथाबुक्क्यानी तोंडावर, हातावर, छातीवर मारले. त्यामुळे चक्कर येवून फिर्यादी जमिनीवर पडला. सुमारे पाच मिनिटांनंतर त्याला काहीशी शुध्द आल्यवार पाहिले असता, मारहाण करणारे घटनास्थळाहून निघून गेले होते. स्वतःला सावरत निखील डोंगरे याने कसेबसे निमज गाठून गावातील एका रुग्णालयात प्रथमोपचार घेतले व घडल्या प्रकाराची माहिती फोनवर कुटुंबियांना दिली. त्यानंतरत्याला पुढील उपचारासाठी संगमनेरातील एका खासगी रुग्णालयात दाखल केले. या बाबत संगमनेर शहर पोलीस ठाण्यात वरील युवकांविरुध्द भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल झाला आहे.

आठ तासांची कामाची वेळ, साप्ताहिक विश्रांती; महाराष्ट्र वेतन नियम लागू



मुंबई : कामगारांच्या वेतनाचे संरक्षण, कामाचे तास आणि वेतन कपातीसंदर्भात एकसमान कार्यपद्धती निश्चित करणारे 'महाराष्ट्र वेतन नियम, २०२६' राज्य सरकारने लागू केले आहेत. त्यानुसार सामान्य कामकाजाचा दिवस आठ तासांचा असेल, तर अन्य वेतन कालावधी असलेल्या कर्मचाऱ्यांचे काम आठवड्याला ४८ तासांपेक्षा अधिक असणार नाही. साप्ताहिक विश्रांती, अतिकालिक कामाचे वेतन, वेतन कपातीवरील मर्यादा आणि वेतनाच्या नोंदी ठेवण्याबाबतही नियमांत तरतुदी करण्यात आल्या आहेत. या नियमांमुळे कामगारांच्या वेतन संरक्षणाला बळ मिळेल, अशी माहिती कामगार मंत्री ड. आकाश फुंडकर यांनी दिली.

वेतन संहिता, २०१९ अंतर्गत हे नियम तयार करण्यात आले आहेत. त्याद्वारे महाराष्ट्र किमान वेतन नियम, १९६३ आणि महाराष्ट्र वेतन प्रदान नियम, १९६३ अधिक्रमित करण्यात आले आहेत. मात्र, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचे किमान वेतन निश्चित करण्यासाठी या नियमांची अंमलबजावणी होणार नाही. वेतन संहितेच्या कक्षेत येणाऱ्या आस्थापनांतील कर्मचाऱ्यांना हे नियम लागू असतील. नव्या नियमांनुसार वेतनाच्या प्रमाणित व्याख्येत मूळ वेतन, महागाई भत्ता आणि रिटेनिंग भत्त्याचा समावेश करण्यात आला आहे. वेतनातून वगळलेल्या भत्त्यांचे किंवा अन्य घटकांचे प्रमाण एकूण मोबदल्याच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असल्यास, ५० टक्क्यांवरील अतिरिक्त रक्कम वेतनात समाविष्ट केली जाणार आहे. त्यामुळे ग्रॅच्युइटीसह अन्य वैधानिक लाभांची गणना करताना वेतनाचा आधार अधिक स्पष्ट होणार आहे.

राज्य सरकार किमान वेतनाचे दर दैनंदिन आधारावर निश्चित करणार आहे. दैनंदिन वेतनाला आठने भागून तासाचा दर, तर २६ ने गुणून मासिक वेतनाचा दर निश्चित केला जाईल. कामाच्या स्वरूपानुसार अतिकुशल, कुशल, अर्धकुशल आणि अकुशल अशा श्रेणींमध्ये व्यवसायांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. परिवर्तनीय महागाई भत्त्यात वर्षातून दोनदा सुधारणा केली जाणार आहे. भारत सरकारच्या श्रम ब्युरोने प्रसिद्ध केलेल्या औद्योगिक कामगारांच्या सरासरी ग्राहक किंमत निर्देशांकाच्या आधारे दरवर्षी १ एप्रिल आणि १ ऑक्टोबरपूर्वी या भत्त्याची गणना केली जाईल.कामाच्या वेळेबाबतही नियमांत स्पष्टता आणण्यात आली आहे. दैनंदिन वेतनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सामान्य कामकाजाचा दिवस आठ तासांचा असेल. अन्य वेतन कालावधी असलेल्या कर्मचाऱ्यांच्या कामाचे तास आठवड्याला ४८ तासांपेक्षा अधिक असणार नाहीत. प्रत्येक कर्मचाऱ्याला साप्ताहिक विश्रांती देणे बंधनकारक असेल. विश्रांतीच्या दिवशी काम करून घेतल्यास त्याबदल्यात अन्य दिवशी विश्रांती द्यावी लागेल. अशा दिवशी काम केल्यास अतिकालिक वेतनाचा दर सामान्य वेतनाच्या दुपटीपेक्षा कमी असणार नाही.

पान १ - वरून गुटखा बंदी कागदावरच ...

पदार्थाची विक्री इतक्या सहजपणे होत असेल, तर संबंधित यंत्रणांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे स्वाभाविक आहे.

संगमनेर शहरासह ग्रामीण भागात गुटखा विक्रीचे मोठे जाळे पसरल्याची चर्चा आहे. काही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर साठवणूक केली जात असल्याचीही माहिती पुढे येत आहे. यापूर्वी अनेक वेळा लाखो रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. पोलिस आणि अन्न व औषध प्रशासनाने कारवाया केल्याच्या बातम्याही प्रसिद्ध झाल्या. मात्र, या कारवायांनंतरही गुटख्याची विक्री थांबलेली दिसत नाही. त्यामुळे जप्तीच्या कारवाया केवळ तात्पुरत्या ठरत आहेत का? मुख्य पुरवठादार आणि वितरकांपर्यंत कारवाई का पोहोचत नाही? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

गुटख्याची विक्री करणाऱ्या किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई करून प्रशासनाने समाधान मानण्यापेक्षा या अवैध व्यवसायाच्या मुळाशी जाणे आवश्यक आहे. गुटखा कुठून येतो, त्याचा पुरवठा कोण करतो, मोठे साठे कुठे ठेवले जातात आणि या संपूर्ण साखळीमागे कोणाचे हात आहेत, याचा तपास होणे गरजेचे आहे. पोलिस यंत्रणा आणि अन्न व औषध प्रशासन यांच्यात समन्वयाचा अभाव आहे का, तसेच कारवाईत सातत्य का राहत नाही, याचीही चौकशी झाली पाहिजे.

गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन तोंडाचा कर्करोग तसेच गंभीर आजारांना निमंत्रण देणारे ठरू शकते. विशेषतः तरुण पिढी आणि अल्पवयीन मुलांपर्यंत हे पदार्थ सहज पोहोचत असतील, तर ही केवळ कायदा-सुव्यवस्थेची बाब राहत नाही, तर समाजाच्या आरोग्याशी निगडित गंभीर समस्या बनते. काहींच्या अवैध आर्थिक फायद्यासाठी भावी पिढीचे आरोग्य धोक्यात येत असेल, तर हे चित्र निश्चितच चिंताजनक आहे.

कागदावर बंदी, कारवाईचा गाजावाजा आणि प्रत्यक्षात खुलेआम विक्री... मग संगमनेरमध्ये गुटखा बंदी नेमकी कोणासाठी? हा प्रश्न आता प्रशासनाने गांभीर्याने घेण्याची वेळ आली आहे.

दुर्धर आजारांच्या रुग्णांना दिलासा

महात्मा फुले जनआरोग्य योजनेत समावेशाची तयारी



मुंबई (वृत्तसंस्था)

- राज्यातील दुर्धर आजारांनी ग्रस्त रुग्णांना वेळेत निदान आणि उपचार मिळावेत, तसेच महागड्या उपचारांचा आर्थिक भार त्यांच्या कुटुंबीयांवर पडू नये, यासाठी अशा आजारांचा महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेत समावेश करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आरोग्य विभागाला दिले आहेत. स्पायनल मस्क्युलर ॲट्रॉफी या दुर्धर आजाराच्या रुग्णांसाठी स्वतंत्र आणि सर्वंकष कार्यपद्धती तयार करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

विधानभवनातील उपमुख्यमंत्र्यांच्या समिती कक्षात राज्यातील दुर्धर आजारांबाबत आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीन सोना, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, आरोग्य आयुक्त संजय कादकर, वाडिया रुग्णालयाचे बालरोगतज्ज्ञ डॉ. अनीष ऐनापुरे, केईएम रुग्णालयाच्या बालरोग विभागाच्या सह-अध्यापिका डॉ. प्रज्ञा जोशी आणि सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.बैठकीत महाराष्ट्रातील डच-रुग्णांची संख्या, आजाराचे निदान, उपलब्ध उपचारपद्धती, औषधांची उपलब्धता आणि रुग्णांना येणाऱ्या अडचणी यावर चर्चा झाली. या आजाराचे लवकर निदान व्हावे, रुग्णांची नोंदणी व्यवस्थित व्हावी आणि उपचारांची प्रक्रिया अधिक प्रभावी व्हावी, यासाठी आरोग्य विभागाने स्वतंत्र डजझ तयार करावी, असे शिंदे यांनी सांगितले.

एसएमए रुग्णांना तोंडावाटे घेण्यात येणाऱ्या औषधांची उपलब्धता सुलभ करण्यावरही त्यांनी भर दिला. आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही रुग्णाचे उपचार थांबता कामा नयेत, असे त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रासाठी केंद्र सरकारने मुंबईतील केईएम रुग्णालयाची 'सेंटर ऑफ एक्सलन्स' म्हणून निवड केली आहे. या केंद्रामार्फत दुर्धर आजारांचे निदान, रुग्ण नोंदणी आणि उपचारविषयक कार्यवाही केली जाते.

मुंबईतील वाडिया बालरुग्णालयातही डच-रुग्णांवरील उपचारांची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे या रुग्णालयाला 'सेंटर ऑफ एक्सलन्स'चा दर्जा मिळावा, यासाठी आरोग्य विभागाने आवश्यक प्रस्ताव तयार करून केंद्र सरकारकडे पाठवावा, असे निर्देश शिंदे यांनी दिले. यासाठी आपण केंद्रीय आरोग्यमंत्र्यांकडे पत्राद्वारे पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

शिक्षणाधिकाऱ्यांच्या विरोधात खा. लंकेंचा जि. प. मध्ये ठिय्या

शिक्षणाधिकारी पाटील यांनी रजा टाकल्यानंतर साडेसहा तासांनी आंदोलन मागे



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांची एसआयटीमार्फत चौकशी सुरू असून, शिक्षकांनीही त्यांच्या कार्यपद्धतीविरोधात अनेक तक्रारी केल्या आहेत. या सर्व तक्रारींची चौकशी पूर्ण होईपर्यंत पाटील यांना सक्तीच्या रजेवर पाठवावे, या मागणीसाठी खासदार नीलेश लंके यांनी बुधवारी जिल्हा परिषदेत ठिय्या आंदोलन केले. तब्बल साडेसहा तास चाललेल्या या आंदोलनानंतर शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी स्वतः रजेचा अर्ज सादर केला. त्यानंतर रात्री साडेआठच्या सुमारास आंदोलन मागे घेण्यात आले.

खासदार नीलेश लंके यांनी बुधवारी दुपारी दोन वाजल्यापासून जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात आंदोलन सुरू केले होते. या आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सिताराम काकडे, योगीराज गाडे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. शिक्षणाधिकारी पाटील यांच्या कार्यपद्धतीविरोधात शिक्षकांनी यापूर्वीही अनेकदा तक्रारी केल्या आहेत. १२ नोव्हेंबर २०२४ रोजी शिक्षकांनी जिल्हा परिषदेवर मोर्चाही काढला होता. मात्र, या तक्रारींवर अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याचा मुद्दा खासदार लंके यांनी उपस्थित केला. पाटील यांची चौकशी सुरू असताना त्यांना पदावर कायम ठेवणे योग्य नसल्याची भूमिका घेत, चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्याची मागणी लंके यांनी केली. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी खासदार लंके यांच्याशी चर्चा केली. तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके यांनीही तोडगा काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, चर्चेतून समाधानकारक मार्ग निघत नसल्याने आंदोलन सुरूच राहिले. दरम्यान, आंदोलनादरम्यान शिक्षण विभागाच्या कार्यालयाला टाळे ठोकण्यात आल्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. या प्रकारानंतर पोलिसही आंदोलनस्थळी दाखल झाले. पोलिसांच्या उपस्थितीत कार्यालयाचे टाळे काढण्यात आले.

आंदोलन सुरू असताना शिक्षणाधिकारी भास्कर पाटील जिल्हा परिषदेत उपस्थित नसल्याने आंदोलकांनी नाराजी व्यक्त केली. अखेर आंदोलन तीव्र झाल्यानंतर शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्याकडूनच रजेचा अर्ज सादर करण्यात आला. त्यानंतर रात्री साडेआठच्या सुमारास खासदार नीलेश लंके यांनी आंदोलन मागे घेतले. या आंदोलनामुळे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील तक्रारी आणि शिक्षणाधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

FDA ची मोठी धडक कारवाई, १.२७ कोटींचा अन्नसाठा जप्त



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या अन्न व्यावसायिकांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. राज्यभर राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत तब्बल १ कोटी २७ लाख रुपयांचा अयोग्य व असुरक्षित अन्नसाठा जप्त करण्यात आला आहे. अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी १२ नामांकित आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले असून, सहा खाद्यविक्रेत्यांना व्यवसाय बंद करण्याच्या नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. तसेच प्रतिबंधित तंबाखू व गुटख्याचा १ लाख ६८ हजार रुपयांचा साठा जप्त करून पाच जणांना अटक करण्यात आली आहे.

अन्न सुरक्षा व स्वच्छतेच्या नियमांचे गंभीर उल्लंघन केल्याचे आढळल्याने बृहन्मुंबई आणि कोकण विभागातील १२ आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. दक्षिण मुंबईतील नऊ नामांकित उपाहारगृहांमध्ये अन्न तयार करण्याच्या ठिकाणी अस्वच्छता, कर्मचाऱ्यांकडे वैद्यकीय तंदुरुस्ती प्रमाणपत्रांचा अभाव, FoSTaC प्रशिक्षण प्रमाणपत्र नसणे, वापरलेल्या खाद्यतेलाच्या गुणवत्तेच्या नोंदी नसणे तसेच अन्न सुरक्षा व्यवस्थापन प्रणालीचे पालन न केल्याचे निदर्शनास आले. यामध्ये कुलाबा येथील कॅफे आयडियल, फोर्टमधील चेतना रेस्टॉरंट, मियां कबाब्स, श्रीयोग रेस्टॉरंट आणि प्रकाश डोसा, कफ परेड येथील बायरूट, चर्चगेट येथील नॅचरल आइस्क्रीम, नरीमन पॉईंट येथील गुप्ता फ्रूट ज्यूस सेंटर आणि कुलाबा येथील सौरभ हॉटेल्स यांचा समावेश आहे. तसेच ठाणे विभागातील ब्लिंक कॉमर्स प्रा. लि., ब्रोड्यामा फूड्स एलएलपी आणि सागर स्वीट अँड बेकरी या तीन आस्थापनांचे परवानेही निलंबित करण्यात आले आहेत. निलंबनाच्या कालावधीत संबंधित आस्थापनांना अन्नपदार्थांची खरेदी-विक्री करण्यास मनाई करण्यात आली आहे. पुणे जिल्ह्यातील मावळ येथील डी-मार्टमध्ये तपासणीदरम्यान कमी दर्जाचे आणि चुकीचे लेबल लावलेले २० हजार ८५ लिटर खाद्यतेल जप्त करण्यात आले. या साठ्याची किंमत ५० लाख २७ हजार ८९३ रुपये आहे. नागपूरमधील वैशाली नगर परिसरातील चापरे रोस्टिंग वर्क आणि न्यू माधव रोस्टिंग या दोन सुपारी प्रक्रिया केंद्रांवर छापे टाकण्यात आले. यावेळी कमी दर्जाची व भेसळयुक्त २५ हजार ३५७ किलो सुपारी जप्त करण्यात आली. या साठ्याची किंमत ७५ लाख १९ हजार ६५४ रुपये आहे.

पुण्यातील माणिकबाग खाऊ गल्लीत राबविण्यात आलेल्या 'ईट राईट स्ट्रीट' मोहिमेदरम्यान विनापरवाना आणि अस्वच्छ वातावरणात खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या सहा विक्रेत्यांना व्यवसाय बंद करण्याच्या नोटिसा बजावण्यात आल्या. तर सोलापूर जिल्ह्यातील अकलूज येथील मातेश्वरी केटरर्सकडून मुदतबाह्य व अनारोग्यकारक १४४ किलो अन्नसाठा जप्त करण्यात आला. यामध्ये तूप, पीठ, बेसन आणि शेव यांचा समावेश आहे. बृहन्मुंबई, पुणे, कोकण, नाशिक आणि नागपूर विभागांत गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखू यांसारख्या प्रतिबंधित पदार्थांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. बोरिवली येथील एका दुकानावर छापा टाकून संबंधितांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले. या मोहिमेत राज्यभरातून एकूण १ लाख ६८ हजार रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला असून, पाच जणांना अटक करण्यात आली आहे.

भोजापूर चारी दुरुस्ती प्रकल्पाला मिळाली प्रशासकीय मान्यता



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- भोजापूरचारी दुरुस्ती प्रकल्पाच्या कामाला आता गती मिळणार आहे.. सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत या प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालाला प्रशासकीय मान्यता मिळाली असल्याची माहिती जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

प्रकल्पासाठी २९ कोटी ६० लाख रुपयांच्या अंदाजपत्रकीय किंमतीस यापूर्वीच मान्यता देण्यात आली असून, या कामामुळे तब्बल १,१०८.११ हेक्टर क्षेत्रावरील सिंचन व्यवस्था पुनर्स्थापित : होणार असल्याचे त्यांनी सांगितले. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून या प्रकल्पाचा प्रस्ताव शिफारशीसह शासनाकडे सादर करण्यात आला होता. त्यानंतर राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती आणि छाननी समितीच्या प्रक्रियेतून या प्रस्तावाला मान्यता मिळाली आहे. महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील सिंचन प्रकल्पांच्या कालवे व वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करून सिंचन व्यवस्था अधिक सक्षम करण्यावर शासनाचा भर आहे. याच कार्यक्रमांतर्गत भोजापूरचारी दुरुस्ती प्रकल्पाचा समावेश करण्यात आला. अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ यांनी यासंदर्भात पाठपुरावा सुरू ठेवला आहे. शासनाच्या मान्यता पत्रानुसार, या प्रकल्पासाठी ३० कोटी रुपयांच्या अनुदानाच्या तुलनेत २९.६० कोटी रुपयांचा प्रकल्प अहवाल सादर करण्यात आला आहे.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

आदिवासींच्या जीवावर उठणारे प्रकल्प नकोत - पद्मश्री पोपेरे

युवावार्ता (प्रतिनिधी)
अकोले-

सह्याद्रीतील जंगलतोड थांबवा, आदिवासींच्या जीवावर उठणारे प्रकल्प नकोत, असे मत बीजमाता राहीबाई पोपेरे यांनी व्यक्त केले. भगवान बिरसा मुंडा आणि आद्यक्रांतिकारक राघोजी भांगरे यांच्या जयंतीनिमित्त घाटघर इकोसिटी येथे १४ व १५ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या दहाव्या निसर्ग व सामाजिक पर्यावरण संमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून पोपेरे बोलत होत्या. संमेलनाचे उद्घाटन लिज्जत पापडचे संचालक सुरेश कोते यांच्या हस्ते झाले. यावेळी संतोष जगधने, समाजसेविका हेमलता



पिचड, पुष्पलता लहामटे, निसर्ग व सामाजिक पर्यावरण संस्थेचे अध्यक्ष प्रमोद मोरे, कार्याध्यक्षा छायाताई राजपूत, वनश्री मोरे-गुणवरे, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब डोंगरे, नामदेव गंभिरे, महेश पाडेकर, रामनाथ भोजने, दत्तू भोईर, बाळासाहेब ढोले आदी उपस्थित होते. भीमाशंकर ते कळसूबाई शिखर या पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील पट्ट्यात विविध प्रकल्प सुरू करण्याच्या हालचालींबाबत संमेलनात नाराजी व्यक्त करण्यात आली. भंडारदरा धरणाच्या शताब्दी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या संमेलनातून आद्यक्रांतिकारक राघोजी भांगरे यांच्या जलाशयभूमीला पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला. पहिल्या सत्रात बिरसा मुंडा यांच्या जल, जंगल, जमीन या विचारांवर विविध मान्यवरांनी मते मांडली. दुसऱ्या दिवशी १५ नोव्हेंबर रोजी रानकवी तुकाराम धांडे यांच्या अध्यक्षतेखाली दुसऱ्या सत्राला प्रारंभ झाला. यावेळी अध्यक्ष प्रमोद मोरे, छायाताई राजपूत आदी उपस्थित होते.

काँग्रेस सत्ताकाळातील विकासाचा हिशोब द्या

बॅनरबाजीच्या वादावर शिवसेना शहर प्रमुख विनोद सूर्यवंशी आक्रमक

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - विरोधकांनी आमदार अमोल खताळ यांच्या विकासकामांवर प्रश्न उपस्थित करणाऱ्यांनी आधी काँग्रेसच्या सत्ता काळातील विकासशून्य कारभाराचा हिशोब द्यावा, अशा शब्दात शिवसेना शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी यांनी करत काँग्रेसच्या तथाकथित युवा नेत्याच्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे.

आमदार खताळ हे सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातून पुढे आलेले संघर्ष शील नेतृत्व असून त्यांना खऱ्या अर्थाने सर्व सामान्यांच्या अडचणींची जाणीव आहे.ते संगमनेरच्याविकासा साठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांच्या प्रत्येक कामावर लक्ष ठेवून केवळ बॅनरबाजीचा मुद्दा उपस्थित करणे म्हणजे जनतेचे लक्ष विकासा पासून विचलित करण्याचा त्यांचा केविलवाणा प्रयत्न असून राजकीय अस्तित्व टिकविण्याचा केविलवाना प्रयत्न असल्याचे सूर्यवंशी यांनी म्हटले आहे.

दुसऱ्यांना सल्ले देणे सोपे असते; मात्र स्वतःच्या राजकीय कारकिर्दी तील कामांचा लेखाजोखा मांडण्याची वेळ आली की अनेकांची बोलती बंद होते, हेच आजच्या टीकेतून दिसून येत आहे. लोकप्रतिनिधींनी केलेल्या कामांची माहिती सर्वसामान्य जनते पर्यंत पोहोचवणे हा दिखाऊपणा नसून जनतेप्रती असलेली जबाबदारी आहे. मात्र, काही लोकांनी विकास कामांची माहिती देणे म्हणजे बॅनर बाजी आणि श्रेय घेणे म्हणजे दिखाऊपणा असा नवा राजकीय नियम शोधल्याची टीका त्यांनी केली.

अनेक वर्षे सत्तेमध्ये असताना शहराच्या आणि तालुक्याच्याविकासा साठी नेमके काय केले, किती प्रश्न मार्गी लावले आणि किती प्रलंबित ठेवले, याची



उत्तरे जनतेला द्यावीत, असे आव्हान त्यांनी दिले. संगमनेरात सध्या विकासाच्या मुद्द्यांवर चर्चा होत असून सध्याच्या बदलत्या राजकीय परिस्थितीचे हेच द्योतक आहे. मात्र, विरोधकांना स्वतःचा राजकीय चश्मा उतरवून पाहण्याची गरज आहे.

विरोधकांनी बॅनर मोजण्यात वेळ घालवण्यापेक्षा स्वतःच्या नेत्यांच्या पूर्वीच्या विकासकामांचा हिशोब मांडण्याची हिंमत दाखवावी. बॅनर किती लागले यापेक्षा रस्ते किती झाले आणि सर्वसामान्यांचे प्रश्न किती सुटले यावरूनच खरी ओळख ठरते. विरोधकांच्या असल्या आरोपां मुळे आ खताळ यांच्या लोकप्रियतेला आणि विकासाच्या घोडदौडीला कोणताही फरक पडणार नाही, कारण संगमनेरची जनता आता केवळ बोलणाऱ्यांना नाही तर काम करणाऱ्यांनाच साथ देणार आहे, असे सांगत शहर प्रमुख विनोद सूर्यवंशी यांनी विरोधकांना प्रत्युत्तर दिले आहे.

जनतेला केवळ राजकीय वक्तव्ये नकोत, तर प्रत्यक्ष कामातून बदल हवा आहे. त्यामुळे बॅनरबाजीच्या चर्चेत अडकण्यापेक्षा संगमनेरच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहनही विनोद सूर्यवंशी यांनी केले.

संगमनेरमध्ये शुक्रवारी निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी 'डिजिटल जीवन प्रमाणपत्र' कार्यशाळा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- निवृत्त कर्मचारी व पेन्शनधारकांना डिजिटल जीवन प्रमाणपत्र (ऊळसळींरश्र डळषश उर्शीिळषळलरींश) तयार करण्याची प्रक्रिया सुलभ व्हावी, यासाठी जिल्हा कोषागार कार्यालयाच्या वतीने विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता संगमनेर तहसील कार्यालयात ही कार्यशाळा पार पडणार आहे.

अहिल्यानगर येथे जिल्हा कोषागार कार्यालयाच्या वतीने आयोजित डिजिटल जीवन प्रमाणपत्र कार्यशाळेदरम्यान जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित करावेत, अशी आग्रही मागणी करण्यात आली होती. या मागणीची दखल घेत जिल्हा कोषागार अधिकाऱ्यांनी अकोले व संगमनेर तालुक्यांतील सर्व शासकीय विभागांच्या निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी संगमनेर येथे या कार्यशाळेचे नियोजन केले.

या कार्यशाळेत जिल्हा कोषागार कार्यालयातील अधिकारी डिजिटल जीवन प्रमाणपत्र कसे तयार करावे, त्याची प्रक्रिया काय आहे, तसेच यासाठी कोणत्या बाबींची आवश्यकता आहे, याबाबत सविस्तर माहिती व मार्गदर्शन करणार आहेत. त्यामुळे अकोले व संगमनेर तालुक्यातील सर्व विभागांतील निवृत्त अधिकारी, कर्मचारी व पेन्शनधारकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.कार्यशाळेस उपस्थित राहताना निवृत्त कर्मचाऱ्यांनी आधार कार्ड, पीपीओ क्रमांक, बँक खाते क्रमांक आणि आधारशी संलग्न नोंदणीकृत मोबाईल फोन सोबत आणणे आवश्यक आहे. तसेच आपल्या परिचयातील अन्य विभागांतील निवृत्त कर्मचाऱ्यांनाही या कार्यशाळेची माहिती देऊन उपस्थित राहण्यास प्रोत्साहित करावे असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर २०२६ रोजी नेवासा कोषागार कार्यालयातही अशाच कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्येही अशा कार्यशाळा आयोजित करण्याचे नियोजन असून, संबंधित तालुक्यांतील निवृत्त कर्मचाऱ्यांनी याबाबत माहिती देऊन संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पान १ वरून - ## संगमनेरच्या...

तसेच लवकरच शहरातील व्यापारी व दुकानदारांची बैठक घेऊन अतिक्रमणाचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. त्यांच्या या पुढाकारातून शहरातील वाहतूक व्यवस्थेला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. मात्र, हा प्रश्न केवळ नगरपालिका किंवा पोलीस प्रशासनाच्या कारवाईने सुटणारा नाही. व्यापारी, दुकानदार, फुटपाथवर व्यवसाय करणारे व्यावसायिक, वाहनचालक आणि नागरिक या सर्वांनीच आपली जबाबदारी ओळखणे गरजेचे आहे. दुकानाबाहेर अतिक्रमण न करणे, वाहतुकीला अडथळा होईल अशा पद्धतीने वाहने उभी न करणे, उपलब्ध पार्किंगचा वापर करणे आणि वाहतूक नियमांचे पालन करणे, या छोट्या-छोट्या गोष्टींमधून मोठा बदल घडू शकतो. संगमनेर शहराचा विस्तार वाढत असताना वाहनांची संख्याही झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे केवळ तात्पुरत्या उपाययोजना न करता कायमस्वरूपी पार्किंग व्यवस्था, अतिक्रमणमुक्त रस्ते, प्रभावी सिग्नल यंत्रणा आणि नियमित वाहतूक नियंत्रण यांची अंमलबजावणी होणे काळाची गरज आहे. अन्यथा भविष्यात वाहतुकीचा प्रश्न आणखी गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

जाहीर निविदा नोटीस

घारगाव ग्रामपंचायत कार्यालय ता.संगमनेर जिल्हा-अ.नगर,यांचेकडून ग्रामनिधी योजना (सन २०२६-२७) अंतर्गत मौजे घारगाव येथे ग्रामपंचायत कार्यालयाचे फर्निचर व रंग रंगोटी करणे ता.संगमनेर.जिल्हा-अ,नगर.(निविदा रक्कम रुपये १,२७,०९७=००)

या कामासाठी नोंदणीकृत सुबे ठेकेदार यांचेकडून दि. २०/११/२०२६ ते दि.२६/११/२०२६ पर्यंत सायंकाळी ०५ वाजेपर्यंत बी.-१ निविदा लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे.सदर निविदा दि. २७/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजे पर्यंत कार्यालयात ठेकेदार अथवा त्यांचे प्रतिनिधींसमोर उघडण्यात येतील.निविदेचा तपशील,अटी,शर्ती,ग्रामपंचायत कार्यालयात पाहावयास मिळतील.सदर निविदा स्विकारणेचा अथवा नाकारण्याचा किंवा मंजूर,नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

निविदेसोबत-१) जि. प.नोंदणी २) जी.एस.टी ३) पॅन कार्ड ४)कामाचे अनुभवाचे दाखले. सदर प्रत-ग्रामपंचायत कार्यालय नोटीस बोर्डावर पाहावयास मिळेल.

ग्रामविकास अधिकारी सरपंच
घारगाव ग्रामपंचायत कार्यालय, ता.संगमनेर, जिल्हा-अहिल्यानगर

अंधारातून प्रकाशाकडे नेणारी प्रबोधिनी एकादशी!

प्रबोधिनी एकादशी म्हणजेच कार्तिकी एकादशी. कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशीला हा पवित्र दिवस साजरा केला जातो. प्रबोधन म्हणजे जागे होणे, स्वतःला जागृत करणे. मात्र, ही जागृती केवळ निद्रेतून उठण्यापुरती मर्यादित नसून ती विचारांची, आचारांची आणि विवेकाची जागृती असली पाहिजे. वाईट विचार, चुकीचे आचरण, अंधश्रद्धा आणि अज्ञानाच्या अंधकारातून माणसाने बाहेर पडावे, हाच प्रबोधिनी एकादशीचा खरा संदेश आहे. आजच्या काळात माणसाच्या जीवनातून भाव, प्रेम, जिव्हाळा, संस्कार आणि संस्कृती हळूहळू हरवत चालली आहे. समाजात रोगट राजकारण, निकोप नसलेली स्पर्धा आणि वैचारिक प्रदूषण वाढताना दिसत आहे. आपणच आपल्या संस्कृतीची मूल्ये विसरत चाललो आहोत. ही परिस्थिती बदलण्यासाठी प्रत्येकाने जागे होणे गरजेचे आहे. अंधश्रद्धा, अज्ञान आणि अविवेकाच्या घोर निद्रेतून बाहेर पडून माणूस ईश्वरनिष्ठ, बुद्धिनिष्ठ आणि विज्ञाननिष्ठ झाला पाहिजे. प्रबोधिनी एकादशी आपल्याला हाच विचार देते.

आज प्रश्न असा आहे की, आपण खरोखर जागे आहोत का? अनेकदा कोणीही उठतो आणि आपल्या संस्कृतीबद्दल, धर्माबद्दल ज्ञान पाजळतो किंवा टीका करतो. अशा वेळी आपण वैचारिकदृष्ट्या झोपलेले असतो. आपल्याला आपल्या धर्माचे, परंपरांचे आणि संस्कृतीचे योग्य ज्ञान असणे आवश्यक आहे. कोणत्याही गोष्टीचा स्वीकार किंवा विरोध करताना विवेकाची आणि विज्ञाननिष्ठ विचारांची जोड असली पाहिजे. हीच खरी वैचारिक जागृती होय.

धार्मिकदृष्ट्याही प्रबोधिनी एकादशीला विशेष महत्त्व आहे. हिंदू धर्मामध्ये प्रत्येक एकादशीचे महत्त्व सांगितले आहे. त्यात



आषाढी आणि कार्तिकी एकादशीला विशेष आध्यात्मिक महत्त्व आहे. आषाढ शुद्ध एकादशीला भगवान विष्णू योगनिद्रेत जातात आणि चार महिन्यांनंतर कार्तिक शुद्ध एकादशीला जागे होतात, अशी धार्मिक श्रद्धा आहे. या चार महिन्यांच्या कालावधीला चातुर्मास असे म्हणतात. भगवंत झोपतात आणि भगवंत जागे होतात, ही आपल्या ऋषिमुनींनी सांगितलेली कल्पना अत्यंत सुंदर आणि अर्थपूर्ण आहे. या कल्पनेतून माणसाला स्वतःच्या कर्तव्याची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला आहे. भगवंत झोपले तर काय होईल, यापेक्षा माणसाने स्वतःच्या जीवनातील कर्तव्य, जबाबदारी आणि विवेक याबाबत जागे होणे अधिक महत्त्वाचे आहे. भगवंताला जागवणे म्हणजे स्वतःमधील चैतन्य, सद्सद्विवेकबुद्धी आणि चांगुलपणा जागृत करणे होय. आपल्यातील राम जागृत व्हावा, आपल्याला आपल्या जबाबदारीचे भान यावे, हा या परंपरेमागील व्यापक विचार आहे. मंदिरात गेल्यानंतर आपण घंटा वाजवतो. मात्र, घंटानादाचा अर्थ केवळ देवाला जागे करणे एवढाच नाही, तर स्वतःच्या मनाला आणि विचारांना जागे करणे हाही त्यामागील प्रतीकात्मक अर्थ आहे. आपल्या वेदांनीही 'उठा आणि जागे व्हा' असा संदेश दिला आहे. अनेक माणसे झोपेतून उठतात; परंतु वैचारिकदृष्ट्या जागी होत नाहीत. त्यामुळे केवळ शारीरिक जागृती नव्हे, तर वैचारिक आणि सामाजिक जागृती होणे आवश्यक आहे. प्रबोधिनी एकादशीचा संबंध रामायणातील एका प्रसंगाशीही जोडला जातो. प्रभू रामचंद्रांना सीतेचा शोध घेण्यासाठी मदत करण्याचा शब्द सुग्रीवाने दिला होता. मात्र, किष्किंधेचे राज्य मिळाल्यानंतर तो राजवैभव आणि सुखोपभोगात रममाण झाला. दिलेल्या शब्दाचा आणि कर्तव्याचा त्याला विसर पडला. त्यावेळी लक्ष्मणाने सुग्रीवाला त्याच्या जबाबदारीची जाणीव करून दिली, अशी कथा सांगितली जाते. या प्रसंगातून दिलेला शब्द पाळणे, कर्तव्य विसरू नये आणि योग्य वेळी जागे व्हावे, हा महत्त्वपूर्ण संदेश मिळतो. या दिवशी तुळशी विवाहाची परंपराही आहे. तुळस ही भारतीय संस्कृतीत पवित्र, मंगल आणि कल्याणकारी मानली जाते. तिला आपण तुळशीमाता म्हणून पूजतो. तुळशीचे धार्मिक महत्त्व तर आहेच; शिवाय तिचे औषधी आणि पर्यावरणीय महत्त्वही मोठे आहे. आपल्या पूर्वजांनी निसर्गातील वनस्पतींना धार्मिक परंपरांशी जोडून त्यांचे संवर्धन आणि जतन करण्याची सुंदर व्यवस्था निर्माण केली. या परंपरांकडे श्रद्धेबरोबरच वैज्ञानिक दृष्टिकोनातूनही पाहिले पाहिजे. वारकरी संप्रदायासाठी प्रबोधिनी एकादशी अत्यंत महत्त्वाची आहे. पंढरपूर आणि आळंदी येथे या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर वारकरी एकत्र येतात. भक्तिभावाने विठ्ठलनामाचा गजर करतात. वारकऱ्यांच्या दृष्टीने वारी ही केवळ पांडुरंगाच्या दर्शनासाठी केलेली यात्रा नाही, तर ती जीवन जगण्याची एक पद्धत आहे. वारी म्हणजे पांडुरंगाशी जोडले जाणे, त्याच्या विचारांशी एकरूप होणे आणि आपल्या मनाला भक्तीच्या मार्गावर नेणे होय. एकादशीचा आध्यात्मिक अर्थही अतिशय सुंदर आहे. पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये आणि अकरावे मन अशी अकरा इंद्रिये भगवंताच्या चरणी अर्पण करणे, असा त्यामागील भावार्थ सांगितला जातो. म्हणजेच आपल्या शरीरातील आणि मनातील सर्व शक्ती चांगल्या विचारांसाठी, सदाचरणासाठी आणि ईश्वरभक्तीसाठी समर्पित करणे. आजच्या धावपळीच्या आणि स्पर्धेच्या युगात प्रबोधिनी एकादशीचा संदेश अधिक महत्त्वाचा ठरतो. आपण केवळ धार्मिक विधी पार पाडून थांबता कामा नये, तर या सणामागील विचार समजून घेतला पाहिजे. अंधश्रद्धेऐवजी श्रद्धेला विवेकाची जोड, द्वेषाऐवजी प्रेम, स्वार्थाऐवजी परोपकार, अज्ञानाऐवजी ज्ञान आणि निष्क्रियतेऐवजी कर्तव्यभावना अंगीकारली पाहिजे. प्रबोधिनी एकादशी म्हणजे केवळ भगवंताच्या जागृतीचा दिवस नाही, तर स्वतःमधील माणूसपण, विवेक, कर्तव्य आणि चांगुलपणा जागवण्याचा दिवस आहे. अंधारातून प्रकाशाकडे, अज्ञानातून ज्ञानाकडे आणि निष्क्रियतेतून कर्तव्याकडे नेणारा हा उत्सव आहे. म्हणूनच या एकादशीच्या निमित्ताने आपण स्वतःला एक प्रश्न विचारूया-आपण खरोखर जागे झालो आहोत का?

प्रा. शशांक गंधे, संगमनेर
मो. नं. ९८९०१६३६४२

डी-मार्टच्या वेअरहाऊसवर अन्न व औषध प्रशासनाचा छापा

५० लाखांचे संशयित खाद्यतेल जप्त

पुणे (प्रतिनिधी) :

मोठ्या ब्रँडच्या नावाखाली विक्री होणाऱ्या खाद्यतेलाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करणारी घटना समोर आली आहे. राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाने सेफ फूड, सेफ महाराष्ट्र मोहिमेंतर्गत मावळ तालुक्यातील आंबी येथील अव्हेन्यू सुपरमार्ट्स लिमिटेडच्या (डी-मार्ट) वेअरहाऊसवर बुधवारी (दि. १८ नोव्हेंबर) धडक कारवाई केली. या कारवाईत तब्बल ५० लाख २७ हजार ८९३ रुपये किमतीचा २० हजार ८५ लिटर संशयित खाद्यतेलाचा साठा जप्त करण्यात आला. विशेष म्हणजे, या साठ्यात आधार, फॉर्च्यून, पतंजली आणि सफोला यांसारख्या नामांकित कंपन्यांच्या खाद्यतेलाचा समावेश असल्याने खाद्यतेलाच्या गुणवत्तेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

अन्न व औषध प्रशासनाच्या दक्षता विभागाच्या सहआयुक्त प्रीती तिपरे आणि पुणे विभागाचे सहआयुक्त (अन्न) श्रीकांत करकळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. मावळ तालुक्यातील आंबी येथील गट क्रमांक ११३, शेड क्रमांक १ मधील डी-मार्टच्या वेअरहाऊसमधील खाद्यतेलाच्या साठ्याची तपासणी करण्यात आली. या तपासणीत काही



खाद्यतेल कमी दर्जाचे (सबस्टँडर्ड) तसेच दिशाभूल करणारे लेबल लावलेले (मिसब्रँडेड) असल्याचा संशय निर्माण झाला. त्यानंतर प्रशासनाने संबंधित खाद्यतेलाचा संपूर्ण संशयित साठा जप्त केला.

जप्त करण्यात आलेल्या खाद्यतेलामध्ये आधार कंपनीचे रिफाइंड सूर्यफूल तेल, फॉर्च्यूनचे राइस ब्रान तेल, पतंजलीचे कच्ची घाणी मोहरी तेल, तसेच सफोला कंपनीचे कोल्ड प्रेस्ड मोहरी आणि शेंगदाणा तेल यांचा समावेश आहे. नामांकित ब्रँडच्या उत्पादनांबाबतच गुणवत्तेचा संशय निर्माण झाल्याने या कारवाईकडे विशेष लक्ष वेधले जात आहे. या कारवाईसाठी पुणे गुप्तवार्ता विभागाचे अन्न सुरक्षा अधिकारी बालाजी शिंदे यांनी संशयास्पद खाद्यतेलाच्या साठ्याबाबत गोपनीय माहिती संकलित केली होती. या माहितीच्या आधारे प्रशासनाने नियोजनबद्ध पद्धतीने छापा टाकून मोठ्या प्रमाणातील साठा ताब्यात घेतला. खाद्यतेल हा प्रत्येक घरातील दैनंदिन वापरातील महत्त्वाचा पदार्थ आहे. त्यामुळे त्याच्या गुणवत्तेशी संबंधित कोणतीही तडजोड थेट ग्राहकांच्या आरोग्याशी निगडित आहे. नामांकित ब्रँडच्या नावाने विक्री होणाऱ्या तेलाच्या साठ्यातच कमी दर्जा आणि दिशाभूल करणाऱ्या लेबलिंगचा संशय आढळल्याने ग्राहकांमध्ये चिंता व्यक्त होण्याची शक्यता आहे. जप्त केलेल्या तेलाचे नमुने आणि पुढील तपासणीतून या प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, अन्न व औषध प्रशासनाच्या या कारवाईमुळे खाद्यतेलाच्या साठवणुकीपासून विक्रीपर्यंतच्या प्रक्रियेवर अधिक काटेकोर लक्ष ठेवण्याची गरज अधोरेखित झाली आहे. ग्राहकांनीही खाद्यपदार्थ खरेदी करताना उत्पादनाची मुदत, लेबल, गुणवत्ता आणि पॅकिंगवरील माहिती तपासण्याचे आवाहन या घटनेच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचे ठरते.

संपादकीय...

मैदानावरच घडते निरोगी आणि आनंदी बालपण!

आजच्या डिजिटल युगात मुलांचे बालपण मोबाईल, टीव्ही, व्हिडिओ गेम्स आणि सोशल मीडियाच्या चौकटीत अडकत चालले आहे. पूर्वी शाळा सुटली की दप्तर घरात टाकून मुलांचा मोर्चा थेट मैदानाकडे वळायचा. गल्लीबोळात क्रिकेट, कबड्डी, खो-खो, लगोरी, लपाछपी, पकडापकडी अशा खेळांचा गोंगाट ऐकू यायचा. संध्याकाळ झाली की आईची हाक येईपर्यंत मुलांचा खेळ संपत नसे. मात्र आज हे चित्र बदलले आहे. मैदानांवरील गर्दी कमी झाली असून मोबाईलच्या स्क्रीनसमोर बसलेल्या मुलांची संख्या वाढत आहे. म्हणूनच आज पुन्हा एकदा मुलांना मैदानात येण्याचे आवाहन करण्याची वेळ आली आहे. खेळ म्हणजे केवळ मनोरंजन नव्हे, तर मुलांच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी माध्यम आहे. मैदानावर खेळताना मुलांच्या शरीराची हालचाल होते, शारीरिक क्षमता वाढते आणि आरोग्य चांगले राहते. धावणे, उड्या मारणे, चेंडू पकडणे, प्रतिस्पर्ध्याला चकवणे या प्रत्येक कृतीतून शारीरिक आणि मानसिक विकास घडत असतो. खेळामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास, निर्णयक्षमता, संघभावना आणि नेतृत्वगुण विकसित होतात. विजय मिळवताना आनंद आणि पराभव स्वीकारताना संयम शिकवणारी शाळा म्हणजे मैदान! पूर्वीच्या पिढीने अनुभवलेले बालपण आजच्या मुलांना अनुभवायला मिळत नाही, ही खेदाची बाब आहे. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये विटीदांडू, गोट्या, भोवरा, पतंग, सायकलिंग अशा खेळांमध्ये रमणारी मुले आता मोबाईलवरील गेममध्ये तासन्तास गुंतलेली दिसतात. आभासी जगात मित्रांची संख्या वाढत असली, तरी प्रत्यक्ष मित्रांसोबत खेळण्याचा आनंद मात्र हरवत चालला आहे. स्क्रीनवर मिळणारे गुण आणि विजय काही क्षणांचा आनंद देतात; परंतु मैदानावर मिळणारा अनुभव आयुष्यभराची आठवण बनतो. यासाठी पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मुलांना मोबाईलपासून दूर राहण्याचा सल्ला देण्याबरोबरच त्यांच्यासोबत मैदानात जाण्याची तयारी पालकांनी दाखवली पाहिजे. शाळांनीही अभ्यासाइतकेच क्रीडा उपक्रमांना महत्त्व द्यावे. प्रत्येक परिसरात खेळण्यासाठी सुरक्षित मैदाने उपलब्ध करून देणे ही स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी आहे. गावोगावी क्रीडा स्पर्धा, उन्हाळी क्रीडा शिबिरे आणि पारंपरिक खेळांचे आयोजन केले पाहिजे. आज गरज आहे ती मुलांच्या हातातील मोबाईल काही वेळ बाजूला ठेवून त्यांच्या हातात क्रिकेटची बॅट, फुटबॉल किंवा कबड्डीचा उत्साह देण्याची. मैदानावर पडताना उठण्याची, हरताना पुन्हा लढण्याची आणि जिंकताना सर्वांना सोबत घेण्याची शिकवण मिळते. हेच खरे आयुष्याचे शिक्षण आहे. चला तर मग, पुन्हा एकदा मैदान गजबजवूया! मुलांना मोकळ्या हवेत खेळू देऊया, त्यांच्या हास्याने परिसर दुमदुमू देऊया. कारण बालपण पुन्हा येत नाही; पण त्यातील आनंदाचे क्षण आपण आपल्या पुढच्या पिढीला नक्कीच देऊ शकतो. मुलांनो, मोबाईल बाजूला ठेवा, मैदानात या... आणि आपले हरवलेले बालपण पुन्हा अनुभवू या! याशिवाय, मैदानावर खेळताना मुलांना निसर्गाशी जोडले जाण्याची संधी मिळते. मातीचा सुगंध, पावसात भिजत खेळण्याचा आनंद, मित्रांसोबत केलेली धमाल आणि खेळताना होणारी छोटी-मोठी भांडणे या सगळ्या गोष्टी बालपण अधिक समृद्ध करतात. मैदानावर जात, धर्म, श्रीमंती-गरीबी असे भेद बाजूला राहतात आणि मैत्रीचे नाते निर्माण होते. आजच्या धावपळीच्या जीवनात मुलांना आनंदी, निरोगी आणि संवेदनशील बनवायचे असेल, तर त्यांना मैदानाशी जोडणे आवश्यक आहे. कारण मैदान मुलांना केवळ खेळ शिकवत नाही, तर जगण्याची कला शिकवते.

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार अर्ज करण्यासाठी मुदत वाढ

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागाद्वारा राज्यातील सर्वोत्कृष्ट क्रीडापटूंना व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना क्रीडा विभागाचा प्रतिष्ठेचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात येतो.शासन निर्णय दि. २९ डिसेंबर, २०२३ व दि. २५ जानेवारी, २०२४ नुसार शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सुधारीत नियमावली, २०२३ विहीत केली आहे. या नियमावलीनुसार सन २०२४-२५ व सन २०२५-२६ या वर्षाच्या पुरस्कारासाठी राज्यातील उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक/ जिजामाता पुरस्कार, खेळाडू, दिव्यांग खेळाडू व साहसी उपक्रमात सहभागी झालेले खेळाडू/व्यक्ती यांच्याद्वारा दि. १२ ऑक्टोबर, २०२६ ते दि. १५ नोव्हेंबर, २०२६ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले होते. अर्ज सादर करणा-या इच्छूक क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, साहसी उपक्रम व दिव्यांग खेळाडू यांना दि. १५ नोव्हेंबर, २०२६ पासून पुढे एकूण १० दिवसांची मुदतवाढ (दि. १६ नोव्हेंबर ते २५ नोव्हें. २०२६ रात्री ११:५९:५९ वाजेपर्यंत) मुदतवाढ देण्यात येत आहे. क्रीडा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ क्रीडा महर्षिकरीता जीवन गौरव पुरस्कार, क्रीडामार्गदर्शकांकरिता उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक/जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार (महिला क्रीडा मार्गदर्शक), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (साहसी उपक्रम), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू) असे पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

विहीत मुदतीत क्रीडा विभागाच्याhttps://sports.maharashtra.gov.in संकेतस्थळावर दि. १२ ऑक्टोबर, २०२६ ते या कालावधीत व दि. २५ नोव्हेंबर, २०२६ रोजी रात्री ११:५९:५९ वाजेपर्यंत फक्त ऑनलाईन अर्ज सादर करण्यात यावेत.

आदिवासी तरुणांसाठी पोलीस व सैन्यदल भरतीपूर्व मोफत प्रशिक्षणाची संधी

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या (एसटी) तरुणांसाठी पोलीस व सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षणाची मोफत संधी उपलब्ध झाली आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर यांच्या वतीने अकोले तालुक्यातील मवेशी येथील प्रशिक्षण केंद्रात चार महिन्यांचे निवासी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणासोबत उमेदवारांना निवास आणि भोजनाची सुविधाही मोफत मिळणार आहे.

हे प्रशिक्षण १ डिसेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत होणार आहे. केवळ अहिल्यानगर जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या मुलांनाच यासाठी अर्ज करता येणार आहे. उमेदवार बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक असून, वय १८ ते २६ वर्षे, उंची किमान १६५ सेंटीमीटर आणि वजन किमान ५० किलो असणे आवश्यक आहे.

उमेदवारांची निवड शारीरिक क्षमता चाचणी आणि लेखी परीक्षेद्वारे केली जाणार आहे. यामध्ये १६०० मीटर धावण्याच्या चाचणीसाठी ५० गुण, तर लेखी परीक्षेसाठी ५० गुण असे एकूण १०० गुण असतील. गुणवत्तेनुसार उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येणार आहे.

इच्छुक उमेदवारांनी बारावीची गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, जातीचा दाखला, आधारकार्ड, रहिवासी दाखला किंवा रेशनकार्ड, डोमिसाईल दाखला आणि चार पासपोर्ट आकाराचे फोटो जोडून अर्ज सादर करावा. अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत २६ नोव्हेंबर २०२६ आहे. अर्ज ऑफलाइन पद्धतीने पोलीस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र, मवेशी, ता. अकोले येथे जमा करावेत. अर्ज केलेल्या उमेदवारांनी २७ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता मूळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतींसह निवड प्रक्रियेसाठी प्रशिक्षण केंद्रात उपस्थित राहावे, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क : ९४२१५२५४१६, ८२७५३४९४१४, ९९६०११२६००.

दरोड्याच्या तयारीत असलेली टोळी जेरबंद

युवावार्ता (प्रतिनिधी)

दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कर्जत तालुक्यातील राशीन-चिलवडी रस्त्यावर सापळा रचून पकडले. या कारवाईत तिघांना अटक करण्यात आली असून, अन्य तिघे पळून जाण्यात यशस्वी झाले. अटक केलेल्या संशयित आरोपींमध्ये पुणे जिल्ह्यातील दौंड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या मोक्का गुन्ह्यातील एका पसार आरोपीचा समावेश आहे.अटकेतील तिघांकडून पोलिसांनी तीन दुचाकी, तीन मोबाईल, कटावणी, कोयता, मिरची पूड यासह दोन लाख ४१ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील दरोडा आणि जबरी चोरीच्या गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेला दरोडा प्रतिबंधक गस्त करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे यांच्या नेतृत्वाखाली पथक नियुक्त केले होते. यामध्ये अंमलदार अरविंद भिंगारदिवे, योगेश भिंगारदिवे, गणेश धोत्रे, भिमराज खर्से, अमोल कोतकर, प्रताप देवकाते, दीपक जाधव, जालिंदर साखरे यांचा समावेश होता. पथकाला मंगळवारी (१७ नोव्हेंबर) राशीन ते चिलवडी रस्त्याने काही जण दुचाकीवरून दरोडा टाकण्याच्या उद्देशाने जात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून कारवाई केली. पोलिसांनी पाठलाग करून बाक्या बंड्या काळे (वय ३९), गोट्या बंडू काळे (वय २५, दोघे रा. आखोणी, ता. कर्जत) आणि धोंड्या ईश्वर भोसले (वय २८, रा. बेलगाव, ता. कर्जत) यांना ताब्यात घेतले. चौकशीत पळून गेलेल्यांची नावे शुभम गहिनीनाथ भोसले (रा. बेलगाव), रोहित नितीन चव्हाण आणि सुमित नितीन चव्हाण (दोघे रा. केडगाव, अहिल्यानगर) अशी समोर आली. दरम्यान, अटक केलेला धोंड्या भोसले हा पुणे जिल्ह्यातील दौंड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात पसार होता. या गुन्ह्यात मोक्का लावण्यात आला आहे

नीट पेपरफुटीचा पर्दाफाश; १४ आरोपींवर आरोप निश्चित

युवावार्ता (प्रतिनिधी)

नीट पेपरफुटी प्रकरणातील १४ आरोपींविरुद्ध आरोप निश्चित करण्याचे आदेश दिल्लीतील न्यायालयाने बुधवारी दिले. विशेष न्यायाधीश अजय गुप्ता यांनी आरोपींना औपचारिकरीत्या आरोप निश्चित करण्यासाठी २१ नोव्हेंबरला न्यायालयात हजर करण्याचे निर्देश दिले आहेत.या प्रकरणामुळे २० लाखांहून अधिक विद्यार्थ्यांचे नुकसान झाले. एनटीए संबंधित तीन विषयतज्ज्ञ मनीषा गुरुनाथ मांढरे, पी. व्ही. कुलकर्णी आणि मनीषा संजय हवालदार यांनी कट रचून परीक्षेतील गोपनीय प्रश्न मिळवले.नांदेडचाही आरोपीन्यायाधीशांनी २५ नोव्हेंबरपासून या खटल्याची सुनावणी दररोज घेण्याचे जाहीर केले. सीबीआयने यापूर्वी पेपरफुटी व सार्वजनिक परीक्षांमधील अन्य गैरप्रकारांशी संबंधित गुन्ह्यांची सुनावणी करणाऱ्या जलदगती न्यायालयात १३ आरोपींविरुद्ध आरोपपत्र दाखल केले होते. त्यानंतर चौदावा आरोपी शेषराव बजरंग सूर्यवंशी ऊर्फ राज सूर्यवंशी याच्याविरुद्ध पुरवणी आरोपपत्र दाखल केले. तो महाराष्ट्रातील नांदेडचा रहिवासी असून, त्याला २ सप्टेंबर रोजी अटक करण्यात आली होती. नीट परीक्षा ३ मे रोजी झाली होती.

CJP चा महाराष्ट्रात पुन्हा एल्गार

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

कॉकरोच जनता पार्टीने केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतल्यानंतर आपला मोर्चा सरकारी शाळांकडे वळवला होता. देशभरातील अनेक शाळांची पाहणी करून त्यांनी सरकारवर निशाणा साधला. केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी अभिजीत दिपके यांनी आक्रमक भूमिका घेतली. मात्र, दिल्ली पोलिसांनी त्यांच्याकडून बॉन्डवर सह्या करून घेतल्या. ज्यामुळे ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात धर्मेंद्र प्रधान यांच्यासारखे आंदोलन उभे करू शकले नाहीत. जंतर मंतरवर परवानगी नसतानाही घुसल्याने आशुतोष रांका आणि सीजेपीच्या बड्या नेत्यांना थेट जेलमध्येही जावे लागले. त्यातच दिवाळीनंतर पुन्हा सक्रिय काम करणार असल्याचे सीजेपीने जाहीर केले. मात्र, गेल्या काही दिवसांपासून अभिजीत दिपके ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात बोलत नाहीत. सोशल मीडियावर काही दिवस याबाबत पोस्टही शेअर केली नव्हती.त्यातच आता पुन्हा सीजेपीने मोठा निर्णय घेतला. सीजेपीकडून महाराष्ट्रातील शाळांची पुन्हा एकदा झाडाझडती घेतली जाणार आहे. दिल्लीनंतर आता सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापुराकडे मोर्चा वळवला आहे. काही दिवसांपूर्वी हिंगोलीतील जिल्हा परिषदेच्या शाळेचा मुद्दा अभिजीत दिपके यांनी उपस्थित केला होता. नाशिकमधीलही शाळांची पाहणी केली.नीट आणि सीएसआरच्या मुद्द्यावरून देशभर केंद्र सरकारविरोधात वातावरण तापविल्यानंतर कॉकरोच जनता पार्टीने आपला मोर्चा पुन्हा एकदा शाळांच्या झाडाझडती मोहिमेकडे वळविला आहे. सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी सरकारी शाळांचे 'स्कुल ठिक करो' आंदोलन सुरूच राहील, असे म्हटले आहे.





कोतूळ येथे रविवारी महाआरोग्य शिबिराचे आयोजन



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - स्व. अशोकजी सिंघल यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त श्री वरद विनायक देवस्थान, कोतूळ आणि प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी यांच्या सहकार्याने रविवारी, २२ नोव्हेंबरला कोतूळ येथे मोफत सर्वरोग निदान व उपचार महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. याच वेळी रुग्णोपयोगी साहित्य भांडाराचा लोकार्पण सोहळाही पार पडणार आहे.

हा कार्यक्रम सकाळी ९.३० वाजता कोतूळ पब्लिक स्कूल येथे होईल. जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि विश्व हिंदू परिषदेचे अखिल भारतीय सहमंत्री शंकरजी गायकर यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ होणार आहे. यावेळी किशोरजी चव्हाण, किशोरजी निर्मळ, जिल्हा पोलिस अधीक्षक मुक्का सुदर्शन, आमदार डॉ. किरण लहामटे आणि माजी आमदार वैभवराव पिचड हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन देवस्थानचे अध्यक्ष प्रदीप भाटे यांनी केले आहे.

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
daily_yuvavarta
VISIT Facebook
Daily yuvavarta

पाहिजेत
कामासाठी मुलगा पाहिजे - जागा -१
संगणक ज्ञान (Microsoft Excel, Tally Erp)
Kshitij Electricals & Instrumentation Works
१४११ संगम हाऊसींग सोसायटी, घुलेवाडी, संगमनेर
9822244035

Jijamata English Medium School
Pavbaki Road Sangamner, CBSE Affiliated School
WALK-IN INTERVIEW
We invite applications for the following positions:
Mother Teachers
Primary & Secondary Teachers
English I Hindi I Marathi I Maths
Social Science I Sport I Computer
Sunday 22nd November 2026 Time : 9:00 am. to 1:00 pm
Freshers can apply
Preference will be given to candidates fluent in English with teaching experince in CBSE Schools or other English Medium Schools
Interested Candidates can submit their updated resumes in person at the school before 20 November 2026 or by email to shewalepatiltrust@gmail.com/ dr.rahulshewale@gmail.com or in person at the school office.
Contact :- 9822304638

पाहिजेत
एजन्सीसाठी मुले पाहिजेत
सेल्समन - २ जागा
हेल्पर - २ जागा
- संपर्क -
९४२२९०५१५५

पाहिजेत
7th Heaven
केकशॉपमध्ये जॉबसाठी फुलटाईम
महिला/ मुली - २ जागा
पुरूष/ मुले- २ जागा
वयोमर्यादा- २० ते ३५ वर्ष
सावता माळी नगर, संगमनेर
7447 877 877

पाहिजेत
नर्सिंग स्टाफ - बीएससी/जीएनएम (मॉर्निंग-२, इव्हीनींग-२, नाईट - २)
ऑपरेशन थिएटर टेक्निशियन (मॉर्निंग-२, इव्हीनींग-२)
रिसेप्शनिस्ट - (इव्हीनींग-२ ते १०)
डाटा एन्ट्री - बी. कॉम (१ जागा)
मावशी/ वॉर्ड बॉय (२ जागा)
कुटे हॉस्पिटल
ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,
8888882225
9766855593

कामगार भरती
अकाउंटंट - ०१ (स्त्री/पुरूष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक
सेल्समन- ०५ (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक
वॉचमन- ०१
ठिकाण - रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स अशोक चौक, संगमनेर
9028342110
9262625962

पाहिजेत
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेल
वेल्डर - 2 जागा
हेल्पर - २ जागा
7030125701
7972963397

पाहिजेत
मे. मोहनलाल बन्सीलाल दरडा
सेल्स सुपरवायझर ०१
गोडाऊन सुपरवायझर ०१
– पत्ता–
श्रद्धा फर्निचर शेजारी, अकोले रोड, संगमनेर
9822426782

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL

सिद्धार्थ एंटरप्राईजेस
कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड संगमनेर
पाहिजेत
एका नामांकित पेपर डिलिंग कंपनी करिता खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्झीक्युटिव -१
एमबीए असल्यास प्राधान्य
ऑफिस असिस्टंट -१
कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक
कार ड्रायव्हर - १
अनुभव असल्यास प्राधान्य
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888

काही लढाया जिंकण्यासाठी नव्हे, अस्तित्व टिकवण्यासाठी लढाव्या लागतात...नगरच्या सहकाराचा खेळखंडोबा



अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेच्या (ADCC) सत्तासंघर्षाने महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा हे सिद्ध केले आहे कि, सहकाराच्या पटलावर कितीही राजकीय वैमनस्य असले, तरी सत्तेचे गणित जुळवताना मोठे नेते कधीही व्यावहारिक तडजोड आणि मुत्सद्देगिरी दाखवू शकतात. अपेक्षेप्रमाणे भाजप व महायुतीच्या पारड्यातील संख्याबळावर डॉ. सुजय विखे पाटील अध्यक्षपदी विराजमान झाले, तर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी आपले पत्ते टाकत आपले जावई रणजितसिंह देशमुख यांना उपाध्यक्षपदी बसवत जिल्ह्याच्या राजकारणात आपण आजही खरे 'किंगमेकर' असल्याचा संदेश दिला.

संख्याबळ, पक्षीय वर्गवारी आणि संचालकांची यादी :

जिल्हा बँकेच्या एकूण २१ जागांच्या गणितीय रचनेवर नजर टाकल्यास सत्तेचे पारडे कुणाच्या बाजूने जड होते, याचे स्पष्ट चित्र समोर येते. या निवडणुकीत काही जागा बिनविरोध झाल्या, तर काही जागांवर चुरशीने मतदान झाले:

अ) बिनविरोध झालेले ११ संचालक:

कोपरगाव: बिपीन कोल्हे (थोरात गट)

नेवासा: माजी मंत्री शंकरराव गडाख (थोरात गट)

पाथर्डी: भाजप आमदार मोनिकाताई राजळे (थोरात गट)

संगमनेर: रणजितसिंह देशमुख (थोरात गट)

शेवगाव: माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राजश्री घुले (थोरात गट)

श्रीरामपूर: नगराध्यक्ष करण ससाणे (थोरात गट)

राहाता: भाजप माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील (विखे पाटील गट)

श्रीगोंदे: दत्ता पानसरे (विखे पाटील गट)

अहिल्यानगर तालुका: आमदार अक्षय कर्डिले (विखे गट)

बिगर शेती संस्था मतदारसंघ: सचिन जगताप (विखे पाटील गट)

जामखेड (सोसायटी मतदारसंघ): सचिन भुमरे (प्रा. **राम शिंदे गट** - महायुती समर्थक)

निवडणुकीने लागलेला १० जागांचा निकाल:

अकोले: संजिवनी शिंदे-गायकर- संजिवनी शिंदे या अपक्ष असल्या तरी त्या विखे पाटील-थोरात समर्थक मानल्या जातात.

कर्जत: ज्योती प्रकाश शिंदे (प्रा. शिंदे गटाच्या, महायुती/विखे समर्थक).

पारनेर: खासदार नीलेश लंके 'सहकार परिवर्तन पॅनल'कडून विजयी.

राहुरी: आमदार प्राजक्त तनपुरे विजयी. ते जरी थोरात-विखे पॅनलमध्ये असले, तरी मूळचे थोरात समर्थक म्हणून ओळखले जातात.

शेतीपूरक मतदारसंघ: आमदार आशुतोष काळे- विजयी (विखे पाटील-थोरात गटाचे समर्थक).

महिला राखीव (दोन जागा): अनुराधा नागवडे आणि संगीता वाघ दोघीही थोरात गटाच्या समर्थक म्हणून विजयी.

अनुसूचित जाती-जमाती मतदारसंघ: माजी आमदार वैभव पिचड (विखे पाटील गटाचे समर्थक).

इतर मागासवर्ग-ओबीसी मतदारसंघ: कारभारी जावळे (२७८४ मते) विजयी (थोरात गटाचे).

भटके विमुक्त मतदारसंघ: गणपतराव सांगळे (थोरात गटाचे).

राजकीय वास्तव: महायुतीचे महायुद्ध आणि मुख्यमंत्र्यांचा वचक

जरी या पॅनलमध्ये किंवा स्थानिक सहकाराच्या राजकारणात संचालक स्वतंत्र मानले जातात परंतु महायुतीतील पक्षीय समीकरणांनुसार (उदा. भाजप, राष्ट्रवादी किंवा महायुतीचे आमदार/नेते) ते पक्षाशी संबंधित आहेत.

या संपूर्ण गणितात राजकीय वास्तव : राज्य आणि केंद्रात महायुतीची सत्ता असल्यामुळे, जर हा समझोता झाला नसता आणि निवडणूक टोकाला गेली असती, तर प्रशासकीय यंत्रणा आणि खुद्द मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारचा मोठा दबाव राहिला असता. अशा स्थितीत, विरोधी बाकवर असणाऱ्या काँग्रेस किंवा इतर गटांच्या उरल्यासुरल्या जागा टिकवणे अत्यंत कठीण झाले असते. याशिवाय, सहकारात उद्या जर शासनाकडून किंवा पक्षाच्या हायकमांडकडून (मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर) थेट अप्रत्यक्ष 'व्हीप' किंवा कठोर आदेश जारी झाला असता, तर या संचालकांना शेवटी सत्तेचा व मुख्यमंत्र्यांचा शब्द पाळावाच लागला असता. हा संभाव्य धोका आणि प्रशासकीय महायुद्धाचे संकट ओळखूनच बाळासाहेब थोरातांनी सरळ युद्धाऐवजी मुत्सद्देगिरीचा मार्ग स्वीकारला.

'गोकुळ' पॅटर्न विरुद्ध 'नगर' पॅटर्न: संघर्ष की व्यावहारिक तडजोड?

या संपूर्ण घडामोडीदरम्यान कोल्हापूरच्या 'गोकुळ' दूध संघाच्या राजकारणाशी नगरची तुलना केली जाते. कोल्हापूरमध्ये जसा आक्रमक संघर्ष पाहायला मिळाला, तशी अपेक्षा नगरमधील कार्यकर्त्यांचीही होती. परंतु, गोकुळची आणि नगरची जमीन-अस्मानाची परिस्थिती वेगवेगळी होती. नगरमध्ये महायुतीचे भक्कम संख्याबळ आणि प्रशासकीय ताकद लक्षात घेता, सरळ लढतीत पराभव निश्चित होता. अशा वेळी, पराभव ओढावून घेण्यापेक्षा आणि उरलेसुरले साम्राज्य गमावण्यापेक्षा, वाटाघाटी करून सत्तेत राहणे आणि संस्थात्मक ताकद टिकवणे हा अधिक व्यावहारिक निर्णय ठरला.

बाळासाहेब थोरात: किंगमेकर आणि उपाध्यक्षपदाची मास्टरस्ट्रोक चाल

सत्तेत असणाऱ्या विखे यांच्या ताकतीसमोर केवळ हातमिळवणी करून थांबणे थोरातांच्या राजकारणात बसत नव्हते. त्यांनी वाटाघाटींमध्ये आपल्या गटाच्या जागा सुरक्षित तर केल्याच, पण काँग्रेसचे नेते तथा आपले जावई रणजितसिंह देशमुख यांना थेट उपाध्यक्षपदाच्या खुर्चीवर बसवून, राज्यात सत्तेवर नसताना व मोठे पद नसतानाही, सत्तेत मोठा हिस्सा मिळवला. हा मुत्सद्दीपणा ठरला.

सोशल मीडियाची मूक भाषा: ज्यावेळेस जो संदेश घ्यायचा, त्याने तो घ्यावा!

सहकारात तग धरण्यासाठी डाव भलेही आखले जावेत, पण पारंपरिक राजकीय वैमनस्य संपले नाही, याचे प्रमाण त्यांच्या सोशल मीडियाच्या वापरातून दिसून आले. जिल्हा बँकेच्या सत्तास्थापनेचा सोहळा पार पडत असताना, बाळासाहेब थोरात यांनी नगर शहरात गाडे पाटील आणि निलेश लंके यांच्या दिवाळी स्नेहमेळाव्यासह इतर कार्यक्रमांचे फोटो आवर्जून शेअर केले; परंतु जिल्हा बँकेच्या संदर्भात किंवा विखे गटासोबत झालेल्या या ऐतिहासिक सत्तास्थापनेचा कोणताही एकही फोटो त्यांनी आपल्या आता अधिकृत फेसबुक अकाउंटवरून शेअर केलेला दिसत नाही. या मूक कृतीतून त्यांनी स्पष्ट संदेश दिला- संस्था वाचवण्यासाठी ही केवळ अपरिहार्य प्रशासकीय तडजोड आहे; आमची वैचारिक बांधिलकी आजही महाविकास आघाडीसोबतच कायम आहे. विखेंचे वाढती ताकद आणि थोरातांची मुत्सद्देगिरी यांचा हा 'नगर पॅटर्न' आगामी काळात जिल्ह्याच्या राजकारणात कोणते दूरगामी परिणाम घडवतो, हे येणारा काळच ठरवेल!

– शाम मुरलीधर कांबळे
यांच्या सहकार्याने

काळ्या जादूची भीती दाखवून ज्येष्ठ दाम्पत्याला सव्वासहा कोटींचा गंडा



मुंबई (वृत्तसंस्था)

दैवी शक्ती, काळी जादू आणि देवाच्या कोपाची भीती दाखवून एका ज्येष्ठ दाम्पत्याची तब्बल ६ कोटी ३८ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार मुंबईतील दहिसर परिसरात उघडकीस आला आहे. पूजा-विधी, वास्तुदोष निवारण आणि घराच्या शुद्धीकरणाच्या नावाखाली दाम्पत्याला मानसिक दबावाखाली ठेवत त्यांचे चार फ्लॅट विकण्यास भाग पाडल्याचा आरोप आहे. फ्लॅट विक्रीतून मिळालेली रक्कम, सोन्या-चांदीचे दागिने, शेअर्स, बँक व पोस्टातील बचत तसेच कर्जाऊ घेतलेले पैसेही आरोपींनी उकळल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणातील ६८ वर्षीय महिला आणि त्यांचे पती पूर्वी दहिसर पूर्व येथील गायत्री सोसायटीत वास्तव्यास होते. डिसेंबर २०१६ मध्ये शेजारी राहणाऱ्या एका महिलेच्या माध्यमातून त्यांची रमाबाई साने हिच्याशी फोनवर ओळख झाली. आपण महालक्ष्मीचे भक्त असून भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ सांगण्याची दैवी शक्ती असल्याचा दावा रमाबाईने केला होता. दाम्पत्याच्या आयुष्यातील काही वैयक्तिक बाबी आणि पतीच्या आजाराबाबत तिने अचूक माहिती दिल्याने तिच्यावर त्यांचा विश्वास बसला. याच विश्वासाचा गैरफायदा घेत पुढील फसवणुकीचे जाळे विणण्यात आल्याचा आरोप आहे.

त्यानंतर उमेश देशपांडे याच्याशी दाम्पत्याची ओळख करून देण्यात आली. २०१७ मध्ये त्याने घरात वास्तुदोष असून काळी जादू करण्यात आल्याचे सांगितले. त्यावर उपाय म्हणून पूजा करण्याच्या नावाखाली ४० ग्रॅम सोन्याची साखळी घेतली. याशिवाय वैयक्तिक कारणे सांगून ३ लाख ८५ हजार रुपयेही उकळल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

पुढे स्नेहलता दीक्षित देसाई ऊर्फ बाईसाहेब हिची ओळख करून देण्यात आली. ती काळ्या जादूचे निराकरण करते, असे सांगून दाम्पत्याच्या मनात अधिक भीती निर्माण करण्यात आली. घरातील वस्तूंवर काळी जादू झाल्याचे सांगत फ्रिज, टीव्ही, एसी, लॅपटॉप, वॉशिंग मशीन, कपाटे, बेड, सोफा यांसह विविध महागड्या वस्तू घरातून नेण्यात आल्याचा आरोप आहे.

२०१८ मध्ये गणेशोत्सवाच्या निमित्ताने दाम्पत्याला गोरेगाव पूर्व येथे बोलावण्यात आले. यावेळी उमेश आणि उर्वशी गायकवाड यांच्या अंगात अनुक्रमे महालक्ष्मी आणि भवानी देवी आल्याचा बनाव करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यानंतर दाम्पत्याच्या घरी पूजा, गोंधळ, बोडण आणि दत्तयाग असे विविध धार्मिक विधी करण्यात आले. घर शापित असल्याचे सांगून त्यांना दहिसरमधील राहते घर सोडण्यास भाग पाडण्यात आले.

ऑक्टोबर २०१८ मध्ये नेपाळमधील साधूचे भस्म असल्याचे सांगून दाम्पत्याला ते सेवन करण्यास देण्यात आले. घरात काळी बाहुली ठेवून कुटुंबाच्या सुख-शांतीसाठी साधूला दागिने अर्पण करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. या भीतीपोटी दाम्पत्याने तब्बल ३०० ग्रॅम सोने आणि ५०० ग्रॅम चांदीची भांडी दिल्याचा आरोप आहे.

नोव्हेंबरमध्ये पुन्हा देवीचा कोप झाल्याचे सांगून दाम्पत्याला कुंकू सेवन करण्यास देण्यात आले. त्यानंतर आणखी ५०० ग्रॅम सोन्याचे दागिने, १२ चांदीची नाणी, चांदीची साखळी आणि मूर्ती घेतल्याचे तक्रारीत म्हटले आहे. अशा प्रकारे वेळोवेळी धार्मिक विधी, दैवी शक्ती आणि काळ्या जादूच्या नावाखाली दाम्पत्याकडून मोठ्या प्रमाणावर मालमत्ता व आर्थिक रक्कम उकळण्यात आली.

या संपूर्ण प्रकारात उमेश देशपांडे, उर्वशी गायकवाड, विशाल गायकवाड, वृशाली गायकवाड, नचिकेत रसाळ, अश्विनी रसाळ, प्रसेनजित रसाळ, संतोष सानप आणि नयन जाधव अशा नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एकूण ६ कोटी ३८ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेले पोस्ट ऑफिस

पोस्ट ऑफिस-- सर्वांना परिचित अशी ही दळणवळणाची संस्था. आपल्या सर्वांच्या माहितीचे असले तरी या संदर्भात बऱ्याच अनोख्या गोष्टी वाचनात आल्या. त्यांचा थोडक्यात परिचय करून देण्याचा हा प्रयत्न आहे.

टेलिफोनच्या शोधा पूर्वीपासून पोस्ट सेवा अस्तित्वात आहे. आज आपण स्मार्टफोनच्या मदतीने कित्येक कोस लांब असलेल्या व्यक्तीशी प्रत्यक्ष बघून संवाद साधू शकतो. परंतु पूर्वी पत्राने खुशाली समजत असे. तात्काळ माहिती पोहोचवायची असेल तर तारेची सोय होती, आता ती कालबाह्य झाली आहे. पत्र पाठवण्यातील उत्साह, पत्राची वाट बघण्यातली आतुरता, पत्र मिळाल्यानंतरचा आनंद अनुभवणारी सध्याची ज्येष्ठ नागरिकांची शेवटची पिढी असावी. पत्राद्वारे माहिती पोहोचवणे एवढेच पोस्टाचे काम नाही. पोस्ट ऑफिस ही सरकारी सेवा आहे. पत्रे व पार्सल यांची वाहतूक हे ऑफिस करते, त्याचबरोबर पोस्ट ऑफिसात बचत योजना, विमा योजना, पासपोर्ट सेवा, बँकेप्रमाणे पैसे भरणे व काढणे अशा सेवा ही उपलब्ध आहेत. सध्या इंटरनेट व ईमेलच्या वापरामुळे पत्र पाठवण्याचे प्रमाण खूपच कमी झाले आहे. मात्र ग्रामीण भागात आजही पोस्ट ऑफिस ही अत्यंत महत्त्वाची सेवा आहे.

जगातील सर्वात जास्त दळणवळणाचे ठिकाण म्हणजे पोस्ट ऑफिस. भारत हा जगातील सर्वात जास्त पोस्ट ऑफिस असलेला देश आहे. मार्च २०२४ पर्यंत १,६४,९७२ पोस्ट ऑफिस भारतात आहेत. १६८८ मध्ये मुंबई आणि मद्रास इथे ईस्ट इंडिया कंपनीने पोस्टाची ऑफिसेस उघडली. परंतु तिथून फक्त कंपनीच्या टपालाचीच ने-आण होत असे. भारतातील दळणवळणाची सोय असलेली टपाल सेवा सर्वप्रथम रॉबर्ट क्लाईव्हने १७६६ मध्ये सुरू केली. त्यानंतर १७७४ मध्ये बंगालचे गव्हर्नर जनरल वॉरेन हेस्टिंग्स यांनी विकसित पोस्ट ऑफिस कलकत्ता येथे सुरू केले. (२५० वर्षांपूर्वी)- आशिया खंडातील हे पहिले पोस्ट ऑफिस. पूर्वी हे मातीच्या घरात होते. स्पीती व्हॅली मधील हे पोस्ट ऑफिस लेटर बॉक्सच्या आकारात बांधले आहे. सध्या ते पर्यटकांचे आकर्षण केंद्र बनले आहे.

सध्या भारतातील सर्वात मोठे पोस्ट ऑफिस



मुंबईत आहे. १७९४ मध्ये याची स्थापना झाली आहे.

भारतात जम्मू-काश्मीरमधील श्रीनगरच्या डल् लेकवर एक तरंगते पोस्ट ऑफिस आहे. एका हाऊसबोटवर पोस्ट ऑफिसच्या सर्व सोयी असलेले हे पोस्ट ऑफिस आहे. लेक वर राहणाऱ्या लोकांच्या सोयीसाठी हे आहे. टपाल पाठवण्यासाठी लेक वरील लोकांना दूरवर जायला नको यासाठी ही सोय हाऊस बोट वर केली आहे. अंदाजे २००७-८ च्या दरम्यान हे पोस्ट ऑफिस सुरू झाले असावे. तरंगणारे हे पोस्ट ऑफिस पर्यटकांना आकर्षित करणारे पर्यटन ठिकाण बनले आहे.

भारतातील पहिले थ्री-डी पोस्ट ऑफिस बेंगळूर इथे आहे. सर्वसाधारणपणे हे तयार व्हायला सहा ते आठ महिने लागले असते. पण एल अँड टी (लार्सन अँड टुब्रो) च्या मदतीने हे अवघ्या ४५ दिवसात पूर्ण झाले आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते याचे उद्घाटन झाले. पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांनी या पोस्ट ऑफिसचे खूप कौतुक केले आहे.

जगात अनेक देशांमध्ये वेगवेगळ्या प्रकारची पोस्ट ऑफिस आहेत. काही आपल्या वास्तुकलेमुळे, काही आपल्या सेवांमुळे व काही आपल्या इतिहासामुळे प्रसिद्ध आहेत.

स्कॉटलंड मधील ऐतिहासिक पोस्ट ऑफिस १७१२ मध्ये सुरू झाले आहे.

अंटार्टिका येथील पेन्विन कॉलनी जवळ पेंग्विन पोस्ट ऑफिस आहे. १९४४ मध्ये हे स्थापन झाले होते. १९९६ मध्ये याचे एका म्युझियम मध्ये रूपांतर झाले व पर्यटकांसाठी खुले केले गेले. इथल्या तिकिटांचे विशेष म्हणजे त्यावर पेंग्विंची चित्रे व अंटार्टिकाची सुंदर दृश्य असतात. ही पर्यटक खरेदी करू शकतात. भारतानेही अंटार्टिका या निर्जन खंडावर पोस्ट ऑफिस उघडले आहे. शास्त्रज्ञांच्या सोयीसाठी हे उघडले आहे. शास्त्रज्ञ आपल्या कुटुंबीयांना पत्रे पाठवू शकतात व त्यांची पत्रे मिळवू शकतात. भारत इथे विविध प्रकारचे संशोधन करत आहे.

फिनलँड मधील रोवेनीएमी येथे सांताक्लॉजचे मुख्य पोस्ट ऑफिस आहे. इथे संताला पत्र पाठवता येते. तसेच येथे क्रिसमसच्या विविध वस्तू, पोस्ट कार्ड, भेटवस्तू खरेदी करता येतात.

स्लोव्हेनिया हा मध्य युरोपमधील सुंदर देश आहे. येथील एक पोस्ट ऑफिस काचेच्या डिझाईनमुळे जगभरात प्रसिद्ध आहे. या पोस्टऑफिसची रचना अशी आहे की दिवसातील वेगवेगळ्या वेळी सूर्यप्रकाशाचा प्रभाव या बांधकामावर पडतो. त्यामुळे पोस्ट ऑफिस चा रंग आणि स्वरूप सतत बदलत असते.

व्हिक्टोरिया फॉल्स- झिंबाबे येथील पोस्ट ऑफिस हे पर्यटकांसाठी आकर्षणाचे ठिकाण आहे. विक्टोरिया फॉल्स हे नैसर्गिक सात आश्चर्यांपैकी एक असल्याने येथील पोस्ट ऑफिसला वैशिष्ट्यपूर्ण म्हटले जाते. दक्षिण आफ्रिकेतील मोसल बे इथे पोस्ट ऑफिस ट्री आहे. येथील प्रसिद्ध झाडाखाली बुटाच्या आकाराचे पोस्ट बॉक्स उभे केले आहे.

अमेरिकेतील सर्वात कुख्यात गुन्हेगारांना अलकाट्रेज येथील कारागृहात ठेवण्यात येत असे .अलकाट्रेज (-श्रलरीीू) या बेटावर एक किल्ला होता. १९३४ मध्ये त्यात सुधारणा करून कारागृह बनवले गेले. अत्यंत सुरक्षित असे हे कारागृह होते. नंतर १९६३ मध्ये हे बंद करण्यात आले, परंतु त्या काळात कैदी, जेलर, तेथील कर्मचारी यांच्या सोयीसाठी पोस्ट ऑफिस उघडले होते. पाण्याखालील पोस्ट ऑफिस ही संकल्पना ऐकून आश्चर्य वाटले ना? पण वानुअतु- पॅसिफिक आयलँड इथे पहिले पाण्याच्या खाली असलेले पोस्ट ऑफिस आहे. हे जगातील एकमेव पाण्याखालील पोस्ट ऑफिस आहे. ऑस्ट्रेलियाच्या पूर्वेला हिडवे आयलँड समुद्री अभयारण्यात तीन मीटर पाण्याखाली हे पोस्ट ऑफिस २००३ मध्ये सुरू झाले आहे. युनिव्हर्सल पोस्टल युनियनचे हे पोस्ट ऑफिस सभासद आहे. पाणबुडी (गोताखोर) आणि स्नॉकलर हे दोघेही वॉटरप्रूफ पोस्ट कार्ड बनवून पोस्ट करतात.स्नॉकलर पोस्टापर्यंत जाऊ शकला नाही तर हिडवे आयलँडची लोकं मदत करतात. इथल्या पोस्ट ऑफिसच्या कर्मचाऱ्यांनी आपले ओपन वॉटर ड्राईव्ह चे शिक्षण पूर्ण केले आहे. इथून स्थानिक व आंतरराष्ट्रीय स्तरावर पत्रांचे वाटप केले जाते. वानुअतु गणराज्य त्याऐंशी बेटांचे बनले आहे. हा एक समुद्री स्वर्गच आहे. इथले सागरी जीवन विलक्षण आहे. इथे असंख्य स्नॉर्किंगची ठिकाणेअसल्याने स्नॉकलरसाठी एक नकाशा बनवला आहे. इथले पोस्ट ऑफिस उघडल्यावर एक नवीन स्टॅम्प पण सुरू केला आहे. तो इको टुरिझममध्ये खूपच लोकप्रिय आहे. हा स्टॅम्प वानुअतू मध्ये उपलब्ध असलेल्या साहसी, सांस्कृतिक व नैसर्गिक सामुदायिक खेळांचे प्रतिनिधित्व करतो. ज्यांना रंगीत कोरल गार्डन व फार मोठ्या संख्येने उष्णकटिबंधीय मासे बघायचे असतील ते नाविकांची मदत घेऊ शकतात. नंतर समुद्रातील रिसॉर्टमधील मोफत स्नॉर्किंगची सेवा घेऊ शकतात. समुद्रातील तापमानात तरुण तसेच वृद्धही स्नॉर्किंगचा आनंद घेऊन शकतात. पर्यटकांना हे पाण्याखालील पोस्ट ऑफिस नेहमीच आकर्षणाचे असते. संपूर्ण जगातील हे पहिले ऑनलाइन पत्र, कुरिअर, सैन्यासाठीची मदत, जहाजातून कुठेही- काहीही- केव्हाही पाठवता येणारे बाजार केंद्र आहे. पोस्ट ऑफिसच्या वेळा हाईडवेच्या बेटावर लिहिल्या जातात.

तसेच पोस्टात कर्मचारी असताना एक विशिष्ट झेंडा फडकावला जातो. पोस्ट ऑफिस बंद झाल्यावरही त्याला लागून असलेल्या पोस्ट बॉक्स मध्ये पत्र टाकली जातात. नंतर ती शहरातील मुख्य पोस्ट ऑफिस मध्ये आणली जातात. या पोस्ट ऑफिसला भेट देणे म्हणजे भरपूर अमर्यादित अशी मजा लुटून आयुष्यभरासाठी अविस्मरणीय ठेवा जमवण्यासारखे आहे.

भारतात केरळ राज्यातील पल्लीकारा गावात पाण्याखाली पोस्ट ऑफिस २०१९ मध्ये सुरू झाले आहे. ते येरीकाड या भागात आहे. समुद्राच्या पृष्ठभागाखाली हे पोस्ट ऑफिस आहे. पाण्याखालील (अंडरवॉटर) असा शिक्का असलेली पोस्ट कार्ड्स इथून पर्यटक विकत घेतात. केरळच्या जलत टुरिझम साठी एक आकर्षण केंद्र बनवणे व पर्यटकांना अनोखा अनुभव देण्याच्या हेतूने हे पोस्ट ऑफिस बनवले आहे. इथे अर्थातच बोटीने जावे लागते.

जगातील सर्वात उंच पोस्ट ऑफिस यांपैकी एक आहे स्विझर्लंडच्या युंगफ्रॉ मधील पोस्ट ऑफिस. हे एक छोटेसे पण खूपच खास पोस्ट ऑफिस आहे. समुद्रसपाटीपासून ३४५४ मीटर उंचीवर आहे. या पोस्ट ऑफिसच्या खिडक्यांमधून आल्पस पर्वताची अद्भुत दृश्य दिसतात.

जगातील सर्वात जास्त उंचीवर असलेले पोस्ट ऑफिस आहे हिमालयाच्या लाहोल- स्पीती जिल्ह्यातील हिक्कीम गावात. १४,५६७ फूट उंचीवर हे पोस्ट ऑफिस आहे. समुद्रसपाटीपासून ४४०० मीटर उंच.

अशी बरीच वेगवेगळी वैशिष्ट्ये असलेली पोस्ट ऑफिस जगभरामध्ये आहेत.

दरवर्षी ९ ऑक्टोबरला जागतिक पोस्ट दिन मानला जातो. तर १० ऑक्टोबर हा राष्ट्रीय टपाल दिन म्हणून साजरा केला जातो.

यामिनी पानगावकर, ठाणे
मो. नं. 9324384570

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
कमी वेदना, जलद बरे होणे
लेझर व प्रगत तंत्रज्ञान
अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

संगमनेरमध्ये हॉटेल साईकृपा आणि कोकोपाम अॅक्वा लाऊंजचा दिमाखदार शुभारंभ

१९७१ पासूनच्या चवीला आधुनिक सुविधांची जोड; मान्यवरांसह नागरिकांची मोठी उपस्थिती





युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर - संगमनेरकरांच्या जिभेवर गेल्या अनेक दशकांपासून अधिराज्य गाजवणाऱ्या आणि १९७१ पासून चव व दर्जेदार सेवेसाठी ओळख असलेल्या हॉटेल साईकृपाच्या नव्या शाखेचा तसेच 'कोकोपाम अॅक्वा लाऊंज'चा भव्य शुभारंभ मंगळवारी (दि. १० नोव्हेंबर) रायतेवाडी फाटा येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. पाडव्याच्या शुभमुहूर्तावर आयोजित या उद्घाटन सोहळ्याला राजकीय, सामाजिक, व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवरांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

रायतेवाडी फाटा, आडवा ओढा परिसरात भारत पेट्रोल पंपाच्या शेजारी उभारण्यात आलेल्या या आकर्षक वास्तूमध्ये 'हॉटेल साईकृपा प्युअर व्हेज' आणि 'कोकोपाम अॅक्वा लाऊंज'च्या माध्यमातून ग्राहकांना आधुनिक सुविधांसह दर्जेदार खाद्यसेवेचा अनुभव मिळणार आहे. पारंपरिक चव, उत्कृष्ट आतिथ्य आणि आधुनिकतेचा संगम साधत साईकृपा परिवाराने संगमनेरच्या हॉटेल व्यवसायात आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे.

या उद्घाटन सोहळ्यास माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, माजी कृषिमंत्री आमदार माणिकराव कोकाटे, नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे, संगमनेरचे आमदार अमोल खताळ, विधानपरिषद सदस्य सत्यजित तांबे, जुन्नरचे आमदार शरददादा सोनवणे, अकोलेचे माजी आमदार वैभवराव पिचड, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, जिल्हा सहकारी बँकेचे संचालक रणजितसिंह देशमुख, मालपाणी उद्योग समूहाचे राजेश मालपाणी, माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, संगमनेरच्या नगराध्यक्षा मैथिलीताई तांबे तसेच मालपाणी उद्योग समूहाचे गिरीष मालपाणी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

आधुनिक सुविधांनी सज्ज आकर्षक वास्तू- नव्या हॉटेलमध्ये प्युअर व्हेज रेस्टॉरंट, सुसज्ज बँकेट हॉल आणि आकर्षक कोकोपाम अॅक्वा लाऊंज अशा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. कुटुंबीयांसोबत भोजनाचा आनंद घेण्याबरोबरच विवाह सोहळे, वाढदिवस, कौटुंबिक स्नेहमेळावे आणि विविध सामाजिक कार्यक्रमांसाठीही हे ठिकाण उपयुक्त ठरणार आहे. विशेष म्हणजे, अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथमच कोकोपाम अॅक्वा लाऊंज हे आकर्षण ग्राहकांसाठी उपलब्ध झाले आहे.

साईकृपा परिवाराच्या विस्तारात नवा अध्याय- '१९७१ पासून तीच चव, तीच सेवा आता नव्या रूपात खास आपल्यासाठी!' या संकल्पनेतून साईकृपा परिवाराने ग्राहकांशी असलेले जुने नाते अधिक दृढ करण्याचा प्रयत्न केला आहे. कसारा गाव (शहापूर) येथील साईनाथ बार अँड रेस्टॉरंट, कसारा बायपास आणि कसारा घाट येथील हॉटेल साईकृपा व हॉटेल न्यू साईकृपा या शाखांनंतर आता संगमनेरमध्ये नव्या शाखेच्या माध्यमातून विस्तार करण्यात आला आहे.

या नव्या प्रकल्पामुळे संगमनेरच्या हॉटेल व्यवसायात एक नवे आकर्षण निर्माण झाले असून, जुन्या चवीचा विश्वास आणि आधुनिक सुविधांची जोड ग्राहकांना अनुभवता येणार आहे. साईकृपा परिवाराच्या या नव्या उपक्रमाचे उपस्थित मान्यवर व नागरिकांनी कौतुक केले.

या संपूर्ण उपक्रमासाठी मालती बाळकृष्ण पा. शिंदे, राजेंद्र बाळकृष्ण पा. शिंदे, विजय बाळकृष्ण पा. शिंदे, प्रकाश बाळकृष्ण पा. शिंदे, राकेश राजेंद्र पा. शिंदे, कल्पेश राजेंद्र पा. शिंदे, विपुल विजय पा. शिंदे, प्रफुल्ल विजय पा. शिंदे आणि अथर्व प्रकाश पा. शिंदे यांनी परिश्रम घेतले.

ऊसतोड कामगारांना बेदम मारहाण

न्यायासाठी घारगाव पोलीस ठाण्यात ठिय्या!



युवावार्ता(प्रतिनिधी)
संगमनेर - ऊस तोडणीच्या कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले असून, शेतकऱ्यांच्या जमावाने ऊसतोड कामगार महिला, मुली आणि लहान मुलांना बेदम मारहाण केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. संगमनेर तालुक्यातील मांडवे बुद्रुक परिसरात बुधवारी दुपारी ही घटना घडली. या घटनेनंतर संतप्त ऊसतोड कामगारांनी न्यायाच्या मागणीसाठी रात्री घारगाव पोलीस ठाण्यात ठिय्या दिला.

संगमनेर येथील थोरात कारखान्याची ऊसतोड कामगारांची टोळी मांडवे बुद्रुक परिसरात ऊसतोडणीसाठी आली होती. बुधवारी दुपारी कामगार ऊस तोडणीचे काम करत असताना शेतातील वाड्याला ऊसाची कांडी जास्त का ठेवली, या कारणावरून शेतमालकाने कामगारांशी वाद घालण्यास सुरुवात केली. यावेळी कामगारांनी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता दोन्ही बाजूंमध्ये बाचाबाची झाली.

दरम्यान, संबंधित शेतकऱ्याच्या मदतीला परिसरातील काही शेतकरी धावून आले. त्यानंतर जमलेल्या शेतकऱ्यांनी ऊसतोड कामगार महिला, मुली आणि लहान मुलांना दांडके, पाइप तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप कामगारांनी केला आहे. या मारहाणीत अनेक महिला जखमी झाल्या असून, एका पुरुष कामगारालाही बेदम मारहाण करण्यात आल्याचे सांगण्यात आले. घटनेनंतर ऊसतोड कामगारांच्या टोळीचा मुकादम जखमी महिला आणि इतर कामगारांच्या नातेवाईकांसह रात्री घारगाव पोलीस ठाण्यात दाखल झाला. आमच्यावर अन्याय झाला असून, संबंधितांवर गुन्हा दाखल करून न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी पोलिसांकडे केली. मात्र, घारगाव पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करण्यात आल्याचा आरोप मुकादमाने केला आहे.

यावेळी मारहाण झालेल्या महिलांनी पोलीस ठाण्यात आपली आपबिती कथन केली. शेतकऱ्यांनी एकत्र येऊन आम्हाला मारहाण केली. एवढेच नव्हे तर आमच्या लहान मुलांना आणि मुलींनाही सोडले नाही, असे सांगताना महिलांनी संताप व्यक्त केला. दरम्यान, ऊसतोडणीसाठी गावोगावी फिरणाऱ्या गरीब आणि कष्टकरी कामगारांवर अशा प्रकारे हल्ला होत असेल, तर त्यांनी न्याय कोणाकडे मागायचा, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या घटनेची निष्पक्ष चौकशी करून जखमी कामगारांना न्याय द्यावा आणि मारहाण करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी ऊसतोड कामगारांकडून होत आहे.

या घटनेमुळे मांडवे बुद्रुक परिसरासह संगमनेर तालुक्यात खळबळ उडाली असून, घारगाव पोलीस या प्रकरणात काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

खंडेरायवाडी शिवारातील वनविभागाच्या क्षेत्रात महिलेचा आढळला मृतदेह



युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर - संगमनेर तालुक्यातील खंडेरायवाडी शिवारात वनविभागाच्या हद्दीतील क्षेत्रात एका ४० वर्षीय महिलेचा मृतदेह आढळून आल्याची धक्कादायक घटना गुरुवार, दि. १९ नोव्हेंबर रोजी सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे खंडेरायवाडी परिसरासह संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे. मृत महिलेचे नाव मनिषा रामदास चाचण (वय ४०, रा. खंडेरायवाडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) असे आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, मनिषा चाचण या बुधवार, दि. १८ नोव्हेंबर रोजी दुपारपासून बेपत्ता असल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर गुरुवारी सकाळी खंडेरायवाडी शिवारातील वनविभागाच्या क्षेत्रात त्यांचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच घारगाव पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून पुढील तपासाच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही सुरू केली आहे. महिलेचा मृत्यू नेमका कोणत्या कारणामुळे झाला, याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही.

दरम्यान, ही घटना अपघाती आहे की यामागे अन्य काही कारण आहे, याचा उलगडा पोलिसांच्या तपासानंतरच होणार आहे. मृतदेह आढळल्याने परिसरात विविध चर्चांना उधाण आले असून, पोलिसांकडून घटनेचा सर्व बाजूंनी तपास केला जात आहे. महिलेच्या मृत्यूचे नेमके कारण काय, याकडे आता परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड , तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल (डॉ. जठार)
डॉ. नितीन जठार
एम.बी.बी.एस., डी.टी.सी.डी. कन्सल्टंट फिजिशियन
तज्ज्ञ : छातीचे हृदय रोग टी.बी. व दम्याचे विकार
डॉ.सौ. उज्वला जठार
एम.बी.बी.एस., डी.सी.एच. कन्सल्टंट पेडियाट्रिशियन
तज्ज्ञ : बालरोग, नवजात अर्भक इन्टेन्स्युअर बेबी केअर
अत्याधुनिक कॅथलॅब (Cath Lab)
शुभ दिपावली
दिवाळीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
२४ तास सुविधांसाठी ☎ 02425 - 224761 | 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

ठुरुनि
ऐक्सक्लाईल मार्केट
सेल... सेल... सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
शालू | कांजीवरम | सिल्क
पैठणी | बनारसी
आकर्षक साड्यांची असंख्य रेंज..
संपर्क :- 8390005001
पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

स्वास्थ्य रक्षणाय रोग परिशमनाय
कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
सर्जरी विभाग
• अतिदक्षता विभाग
• अपघात विभाग
डायलिसीस विभाग
• सुपर स्पेशालिटी विभाग
• न्यूरोविभाग
हृदयरोग विभाग
• मेडिसीन विभाग
• अद्ययावत कॅथलॅब
जॉईंट रिप्लेसमेंट
• स्पाईन सर्जरी
• मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना अॅम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25